# शेतकरी संघटक

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. २५

किंमत १ रुपया

वर्ष ९ वे | ६ सप्टेंबर १९९२ | अंक ११ वा


# शेतकऱ्यांच्या पोटावर नव्हे, पाठीवर थाप मारणारा राजा हवा

**– शरद जोशी**

हा आगळावेगळा आणि आल्हाददायक प्रसंग आहे. स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा स्मृतिदिन आहे. सर्व गंभीर भावनाही मनात आहेत. पण, प्रसंग आगळावेगळा अशासाठी की, शेतकऱ्यांच्या एका राजाचं कौतुक करण्याच्या या कार्यक्रमाला संपूर्ण महाराष्ट्राच्या विधानसभेचे सभापती स्वतः अध्यक्ष म्हणून उपस्थित आहेत. राज्याचे मुख्यमंत्रीसुद्धा शेतकऱ्यांच्या या कार्यक्रमाला हजर राहाणं आवश्यक समजून हजर आहेत हेही विशेष आहे. सर्वसाधारणपणे पंतप्रधान, मुख्यमंत्री इत्यादी हे कारखानदारांचे, व्यापाऱ्यांचे असे कार्यक्रम झाले तर त्याला आवर्जून हजर राहातात, पण शेतकऱ्यांच्या कार्यक्रमाला तितके आवर्जून हजर राहात नाहीत. पण हा एक अपवादाचा कार्यक्रम झाला आहे.

वसंतराव नाईकांच्या स्मृतीला आदरांजली वाहण्याच्या आणि ज्या आमच्या शेतकऱ्यांनी कौतुकास्पद काम करून दाखविले आहे त्यांच्या कामाचं कौतुक करण्याच्या या कार्यक्रमाला हजर राहण्याकरिता आपण मला निमंत्रण दिले याबद्दल प्रथम मी तुमचे आभार मानतो. तसा मी काही या कर्तबगार शेतकऱ्यांचं कौतुक करण्यास पात्र माणूस नाही. शेतीमध्ये मी काही प्रयोग केले असतील, नसतील. इथे जमलेली मंडळी ही वेगवेगळ्या क्षेत्रांत कर्तबगारी गाजविलेली मंडळी आहे. कुणी द्राक्षाचं काम केलं आहे, कुणी निर्यातीचं काम केलेलं आहे, कुणी रत्नागिरीला हापूस आंब्याचं काम केलेलं आहे. त्यामुळे, मला येथे येण्याचा मान देणे म्हणजे एखाद्या नॉनमॅट्रीक माणसाला एकदम एखाद्या युनिव्हर्सिटीचा व्हाईस चॅन्सलर नेमावं असं झालं आहे. तरीही, या कर्तबगार मंडळींना समोरासमोर भेटून त्यांच्या गळ्यात हार घालण्याचे भाग्य लाभते आहे म्हणून, प्रकृतीचं कारण बाजूला ठेऊन, पुसदसारख्या दुर्गम गावी मी आवर्जून हजर राहिलो आहे.

स्व. वसंतराव नाईकांचं गुणवर्णन करतांना एक दोघांनी, ते बारा वर्षे महाराष्ट्राचे

### मीठ, मिरची तेल आणि डाळ व भाकर

पुसद येथे स्व. वसंतराव नाईक प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी १८ ऑगस्ट रोजी शेतकरी नेते वसंतराव नाईक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात येते व त्यावेळी, शेतीक्षेत्रात विशेष कामगिरी केलेल्या शेतकऱ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.

या वर्षीच्या कार्यक्रमास प्रतिष्ठानाने महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री श्री. सुधाकरराव नाईक यांच्यामार्फत शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वागतपर भाषणात मुख्यमंत्र्यांनी आपण या व्यासपीठावर (शासनाविरुद्ध आंदोलन करणाऱ्या) शरद जोशींना निमंत्रित केल्याबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही असे सांगितले. त्यांच्या भाषणातील काही ठळक मुद्दे असे आहेत –

★ शेतीचे व शेतकऱ्यांचे प्रश्न हाच आमच्या व शरद जोशींच्या कामाचा मूलभूत गाभा आहे.

★ राजकारणाच्या मर्यादा ओलांडून, शेतीच्या व शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी मूलभूत काम करणाऱ्या मंडळींचे एक व्यासपीठ असावे ही त्यांनी कल्पना ग्राह्य आहे. किंबहुना, अशा मंडळींचे विचार ऐकून घ्यावे या करिताच या सर्वांना येथे निमंत्रित केले आहे.

★ प्रश्नांच्या निराकरणासंबंधी केंद्रशासनाने ठरवलेले अग्रक्रम जसेच्या तसे राज्याने स्वीकारले पाहिजेत असे नाही; कारण, राज्याचे अग्रक्रम आणि केंद्रशासनाचे अग्रक्रम यांत फरक आहे.

★ निदान महाराष्ट्रामध्ये तरी, सर्वसामान्य गरीब माणूस केंद्र मानून नियोजन करावं असा आमचा प्रयत्न आहे. गरीबात गरीब माणसाला मीठ, मिरची तेल आणि डाळ व भाकर एवढं मिळालं पाहिजे असं महाराष्ट्रात तरी नियोजनाचं सूत्र आम्ही ठरवणार आहोत – मग त्यासाठी राज्याच्या तीन हजार कोटींच्या बजेटमधील दोनतीनशे कोटी रुपये खर्च करावे लागले तरी चालेल.

★ भूगर्भातील पाणी आणि भूपृष्ठावरील पाणी याचं नियोजन येत्या ३/४ वर्षात करणं आवश्यक आहे.

या कार्यक्रमात श्री. शरद जोशी यांनी केलेले भाषण येथे प्रकाशित करण्यात येत आहे.

नेते होते असे म्हटले. यात थोडी गल्लत होते आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री असणं म्हणजे महाराष्ट्राचा नेता असं काही समीकरण नाही. मी शेतकरी आंदोलनात पडल्यापासून महाराष्ट्रात पुष्कळ मुख्यमंत्री होऊन गेले. आज मागे वळून पाहिलं तर त्यांना महाराष्ट्राचे नेते म्हणणे अवघड आहे. महाराष्ट्राचं मुख्यमंत्रीपद महाराष्ट्राचं नेतृत्त्व मिळविण्याची पहिली पायरी असू शकेल; ही पायरी घेतलीच पाहिजे असेही नाही.

सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री झाल्यानंतर त्याचं टेलिव्हिजनवरील पहिलं भाषण ऐकल्यावर त्यांना मी जे पत्र लिहिलं त्यात पहिलं वाक्य असं होतं, ''कोणी मुख्यमंत्री झाले किंवा कोणी पंतप्रधान झाले म्हणजे त्यांचं अभिनंदन करणारी जी गर्दी उसळते त्या गर्दीत मिसळणारा मी नाही. पण तुमचं भाषण ऐकलं आणि मला असं वाटलं की वसंतरावांची परंपरा कदाचित् चालवू शकेल असा मनुष्य मुख्यमंत्रीपदावर आला आहे.'' मला काही त्यांच्याकडून काही मिळवायचं आहे म्हणून मी त्यांचं कौतुक केलं नाही. उलट, मी त्यांना सांगितलं आहे की मी तुमच्याकडे जे काही मागायला येईन ते शेतकऱ्यांकरिता मागायला येईन; माझ्याकरिता कदापि काही मागणार नाही. पण, वसंतरावांची गादी नसली तरी त्यांचं व्रत चालवण्याचा प्रयत्न खरोखरी कोणी केला असेल तर तो त्यांच्या पक्षीय किंवा शासकीय वारसांनी नव्हे, तर तो आम्ही रस्त्यावर बसणाऱ्या शेतकऱ्यांनी केला असं मी आग्रहाने मांडून इच्छितो. मोठ्या लोकांचं दुर्दैव असं असतं की त्यांचे शिष्य त्यांच्या मोठेपणाच्या सावलीत येतात. महात्मा गांधी होऊन गेले नंतर त्यांच्या शिष्यांना, काय करावं, समजेनासं झालं. मग कोण सूतच काततोय, तर कोणी ग्रामसफाईच करतोय! गांधीजींच्या नेतृत्वातील क्रांतीकारकता बाजूला राहून गेली आणि त्याची फक्त रूढी किंवा आचारप्रचार तेवढाच शिल्लक राहिला. तसंच, वंसतरावांसारखा दिग्गज माणूस निघून गेला आणि मग ते त्यांचं काम करतानां जसे दिसायचे तसे आपण दिसलो म्हणजे झाले अशी त्यांच्या वारसांची धारणा झाली.

स्व. वसंतरावांच्या मागची प्रेरणा काय होती? इथं काही त्यांच्या संपूर्ण कामाचं अवलोकन करणं शक्य नाही. पण त्यांनी केलेली महत्त्वाची कामं कोणती?

रोजगार हमी योजना सर्व जगभर गाजली. ही योजना आपणच अमलात आणली असं श्रेय घेणारे, महाराष्ट्रातले निदान दोनचार नेते मी पाहिले आहेत. पण रोजगार हमी योजनेचे खरे श्रेय वसंतरावांना आहे. कापूस एकाधिकार खरेदी योजना हे त्यांचे आणखी एक श्रेय. भाताला आधारभूत किंमतीपेक्षा अधिक किंमत द्यायची नाही असे धोरण केंद्रसरकारने आखले. त्यावेळी वसंतराव नाईकांनी मुख्यमंत्री या भूमिकेतून केंद्रसरकारला ठणकावून सांगितले की, ''लेव्हीचे भात तुम्हाला आधारभूत किंमतीने दिल्यानंतर उरलेल्या भाताला मला जी योग्य वाटेल ती किंमत मी देईन.'' वसंतराव हे ज्वारीच्या खरेदीची व्यवस्था करणारे मुख्यमंत्री होते. म्हणजे त्यांची प्रेरणा काय होती?

भारतात शेती ही जीवनशैली म्हणून मानली जात असे. त्यात कुणी टाटाबिर्ला होऊ शकत नव्हता. शेतकऱ्यांनी सकाळी उठून कामाला लागावं, पाऊस पाडणाऱ्या वरच्या परमेश्वराचं कौतुक करावं, त्याचे आभार मानावे, त्याच्या मर्जीला जे काही येईल आणि आपल्या पदरामध्ये तो जे काही घालेल त्यावर जगावं आणि समाधान मानावं अशी ही जीवनशैली होती. अगदी शाळाकॉलेजातील पुस्तकांतसुद्धा लिहिलेलं असायचं की शेतीकडे व्यवसाय म्हणून बघू नका, ती एक जीवनशैली आहे! म्हणजे, शेतावर नांगर चालवता चालवता तुमच्या अंगावरचं धोतर फाटकंच राहिलं, मळकंच राहिलं तरी तक्रार करू नका. गावातला पोरगा शहरात गेला आणि कोणत्यातरी बँकेत नुसता चपराशी झाला की तीन महिन्यांच्या आत टेरिलीनची पँट घालून, खांद्याला ट्रन्झिस्टर लटकावून गाणी गुणगुणत खेड्यात येतो त्याच्याबद्दलही तक्रार करू नका. कारण, त्याची जीवनशैली वेगळी आणि शेतकऱ्याची जीवनशैली वेगळी!

या जीवनशैलीतून शेतकऱ्यांना बाहेर काढण्याचं काम करणारी जी मंडळी होऊन गेली त्यांमध्ये जोतिबा फुले, शाहू महाराज यांची नावे घेतली जातात. या परंपरंतले वसंतराव नाईक हे शेवटचे शेतकरी नेते होते असे म्हणावे लागले. त्यांनी काय केलं?

शेती ही आता जीवनशैली नाही, शेती हे एक शास्त्र आहे, कौशल्य आहे. जशी जमेल तशी शेती करायची नाही; आवश्यक तर पाण्याची व्यवस्था करायची आहे, चांगलं बियाणं वापरायचं आहे, खतंऔषधं वापरायची आहेत आणि शास्त्रीयदृष्ट्या शेती करून उत्पादन वाढवायचं आहे. शेतीकडे पाहाण्याचा हा एक दुसरा टप्पा झाला. याला आपण हरितक्रांतीचा टप्पा म्हणू. स्व. वसंतराव नाईक हे शासनातर्फे हरितक्रांतीच्या टप्प्याचे अग्रणी होते.

शेतकऱ्यांच्या नेत्याच्या स्मृतीदिनी कर्तबगार शेतकऱ्याचं कौतुक करण्याचा हा समारंभ पाहाता पाहाता एक आठवण होते आहे. कोल्हापूरला शाहू महाराज शेतकऱ्यांच्या, गावच्या जत्रांना मुद्दाम हजर राहात. आणि शेतकऱ्यांच्या हा राजा, जत्रेतून चालता चालता, शेतकऱ्याचा एखादा चांगला बैल दिसला तर मुद्दाम उभं राहून कौतुक करून, जाणकारपणानं त्या बैलाचं मूल्यमापन करून त्या शेतकऱ्याला बोलावून त्याच्या पाठीवर थाप मारत असे. आणि शेतकऱ्याच्या राजाने आपल्या पाठीवर थाप मारली म्हणजे आपले पूर्वज स्वर्गाला पोहोचले इतका आनंद त्या काळच्या शेतकऱ्यांना होत असे. आज असं होतं, नाही असं नाही!

पण, परवा पंधरा ऑगस्टला पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी काय भाषण केलं? मला काही त्यांच्यावर टीका करायची नाही. उलट, शेगाव मेळाव्यापासून, त्यांनी अंगीकारलेल्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या कार्यक्रमाचा मी पुरस्कार करीत आलो आहे.

पण, जर का शेतकऱ्यांचा खराखुरा प्रतिनिधी लाल किल्ल्यावरून १५ ऑगस्ट १९९२ रोजी भाषण द्यायला उभा राहिला असता तर त्यानं भाषणामध्ये पहिलं वाक्य काय वापरलं असतं माहीत आहे? त्यानं म्हटलं असतं, ''मला भारतातल्या सगळ्या लोकांचं, शेतकऱ्यांचं अभिनंदन करू द्या. पाऊस येतो की नाही अशी चिंता होती, पण बहाद्दरानो, पाऊस आला; चांगली पिकं येणार आहेत.'' भारताच्या खऱ्याखुऱ्या पंतप्रधानाचं लाल किल्ल्यावरचं पंधरा ऑगस्टचं भाषण हे त्या वर्षीच्या पावसासंबंधाने सुरू झाले पाहिजे असा माझा आग्रह आहे. हे झालं नाही कारण, शेतकऱ्यांचे नेतृत्व शासनाला असावे ही पद्धती हरित क्रांतीच्या काळामध्ये कुठेतरी खंडित झाली.

आज मला सुधाकरराव नाईकांनी, इथल्या प्रतिष्ठानानं मला आग्रहानं बोलावलं. मी जे काही थोडंथोडकं शेतीसंबंधी लिहिलं त्याचं

कौतुक केलं. पण मला आठवतं की १९८० साली आम्ही एवढचं म्हटलं की, पश्चिम महाराष्ट्रामध्ये तुम्ही उसाचं फार मोठं साम्राज्य निर्माण केलं म्हणता, पण उसाला भाव नाही. उसाला टनाला ३०० रुपये भाव मिळावा एवढीच मागणी आम्ही केली होती. ही मागणी काही काँग्रेसविरोधी नव्हती. त्यावेळी माधवराव बोरस्तेंसारखी काँग्रेसची नेतेमंडळी माझ्याबरोबर व्यासपीठावर हजर होती. त्यामुळे त्याला काही विरोधी पक्षाचा वास नव्हता. आमचं पहिलं कांद्याचं आंदालन झालं तेव्हा दिल्लीला जनता पक्षाचं सरकार होते. मोहन धारियांनी कांद्यावर निर्यातबंदी लावली म्हणून आम्हाला कांद्याचं आंदोलन करावं लागलं. म्हणजे आमच्या आंदोलनाला कोणताही पक्षीय वास नव्हता. पण, त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांनी म्हटलं की, ''शरद जोशी हे आधी खरे शेतकरी आहेत हे त्यांना सिद्ध करू द्या. मग आम्ही त्यांच्याशी चर्चा करायची किंवा नाही ते बघू'' आता निदान, मी शेतकरी असो वा नसो, बोलण्यालायक प्राणी आहे असं शासनाचं मत झालं हेही काही वाईट नाही.

सुधाकरराव नाईकांच्या दूरदर्शनवरील त्या भाषणाने एक आशा तयार झाली. ती आशा खोटी ठरणार नाही असे मी धरतो. कारण, आम्ही शेतकरी फार वेळा मृगजळामागे धावतो. फार मोठे नेते म्हणून आम्ही पुष्कळ मुख्यमंत्र्यांच्या मागे गेलो. त्यातले काही आमच्या बरोबरही होते. नंतर असा अनुभव आला की, मुख्यमंत्री झाल्यावर प्रत्येक वेळी भेटले म्हणजे दिलखुलास हसून, गोडगोड बोलून आम्ही जे काही मागू त्याला 'हो' म्हणायचं आणि अंमलबजावणी शून्य. सुधाकररावांच्या भाषणावरून वाटलं की ते काहीतरी वेगळं करून दाखवतील आणि या आशेनं मी त्यांना पत्र लिहिलं.

सुधाकररावांकडून केलेली अपेक्षा काही फार मोठी नाही. आम्हा दोघांच्या विचारांमध्ये फार मोठा फरक आहे असंही नाही. फरक काय आहेत?

आताच सुधाकररावांनी म्हटलं की गरीब माणासाला, अगदी शेवटच्या माणसालाही मीठ, मिरची, तेल, ज्वारी आणि डाळ हे पाच पदार्थ मिळाले पाहिजेत. यात काही वाद नाही. हे पदार्थ सगळ्यांना स्वस्तात स्वस्त, ठराविक भावाने, चांगल्या गुणवत्तेचे मिळाले पाहिजेत. यात काही वाद असण्याचे कारण नाही. कदाचित् आज आपण मीठ, मिरची, तेल, ज्वारी, डाळ म्हणू आणि मुख्यमंत्री म्हणून सुधाकरराव नाईक व त्यांचं राज्य चालू राहिलं तर, मी अशी आशा करतो की, पाच वर्षांमध्ये आपण त्यांच्यामध्ये थोडेथोडे दूधदुभते, भाज्या आणि फळफळावळसुद्धा घालू. पण, पन्नास वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर आम्ही अजून मीठमिरचीवरच आहोत, ही माझी खंत आहे.

आणि मीठमिरची जर गरिबांना पोहोचवायची असेल तर त्यासाठी सुधाकररावांनी एक चांगलं वाक्य वापरलं की, बजेटामधले दोनतीनशे कोटी रुपये घालायला लागले तरी चालतील पण मीठ, मिरची, तेल, ज्वारी, डाळ सगळ्यांना मिळाली पाहिजे.

केंद्र शासनाचं धोरण असं नाही. आणि गेली चाळीस वर्षे ते असं नाही. जर का गरीबांना मिरची, तेल, ज्वारी, डाळ स्वस्त द्यायची असेल तर त्या करिता मिरचीचा भाव पाडला पाहिजे, भुईमुगाचा भाव कमी राहिला पाहिजे, ज्वारीचा कमाल भाव ठरला पाहिजे; त्याच्या वर जर का भाव जायला लागला तर परदेशातून आयात करून त्या वस्तू आम्ही इथं ओतू, पण भाव वर जाऊ देणार नाही हे केंद्र शासनाचं धोरण आहे.

मीदेखील शेती करायला लागलो तेव्हा सत्कारमूर्ती शेतकऱ्यांच्या उत्साहानंच करायला लागलो. मी काही आंदोलन करायला आलो नव्हतो. पण, जन्मानं शेतकरी नसल्याने मला शेती वाचून वाचून करायला लागायची. नव्याने लग्न झालेली गृहिणी जसं स्वयंपाकशास्त्रावरील पुस्तक वाचत वाचत स्वयंपाक करते तशी मी शेती करीत होतो. त्यावेळी आबासाहेब पाटील शेतकरी मासिक चालवायचे. भुईमूग कसा करायचा? आबासाहेबांनी लिहिलं की भुईमुगामध्ये तीनदातरी खुरपणी करावी. त्यावेळी मी स्वित्झर्लंडमधून संयुक्त राष्ट्रातील नोकरी सोडून आलो होतो, थोडा प्रोव्हिडंड फंड शिल्लक होता. आम्ही, आबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे खुरपणी केली. आणि नंतर माझ्या असं लक्षात आलं की तीन खुरपण्या करून आपलं काही जमायचं नाही. भुईमुगाला जो भाव मिळतो तो पाहाता तीन खुरपण्या परवडायच्या नाहीत. मग हळूहळू आम्ही एका नवीन तंत्रज्ञानाकडे आलो. त्याला मी नाव दिलं आहे, हरित क्रांती नाही, तर सर्व्हायव्हल टेक्नोलॉजी (Survival Technology). म्हणजे, शेतकरी म्हणून जगून राहायचं असेल तर जे तंत्रज्ञान वापरायला लागतं त्याला आम्ही सर्व्हायव्हल टेक्नॉलॉजी म्हणतो. हे तंत्रज्ञान वापरायचं नसेल तर मग दुसरा एक उपाय आहे. तो म्हणजे गावच्या दूध सोसायटीमध्ये निवडून जायचे किंवा आसपासच्या सोसायट्यांच्या राजकारणात पडायचं, निवडणुका लढावयाच्या वगैरे.पण, त्या क्षेत्रात गेलं की मग काही, शेतीमालाचा उत्पादनखर्च किती आहे आणि त्याला किंमत काय मिळते याला काही फारसं महत्त्व राहात नाही. पण शेतकऱ्यांना सर्व्हायव्हल टेक्नॉलॉजी शिवाय पर्याय राहात नाही, याचे कारण केंद्र शासनाचे धोरण आहे.

मी शंकरराव चव्हाणांना ते मुख्यमंत्री असतांना कपाशीच्याबद्दल एक आवाहन केलं होतं, आणि आताच्या शासनालाही करीत आहे. उत्पादन वाढवायचं आहे ना? आम्ही शेतकरी तुमच्याबरोबर आहोत; आम्हाला दुसरं काम काय आहे? पण जेव्हा जेव्हा तुम्हाला असं पटेल की केंद्र शासनाचं धोरण हे शेतकरीविरोधी आहे त्यावेळी तुम्ही तुमचा पक्ष सोडायचा नाही, तुमची खुर्ची सोडायची नाही फक्त दिल्लीला जाऊन एक वाक्य बोला की, ''तुमचं हे धोरण चुकीचं आहे असं आम्ही शेतकऱ्यांच्यावतीने, नम्रपणे तुमच्या नजरेस आणू इच्छितो.'' एवढं म्हणायला काही हरकत नाही ना?

दिल्लीच्या सध्याच्या काही धोरणांबद्दल मला चिंता आहे. पंजाबमधला शेतकरी गव्हाच्या बाबतीत अत्यंत संतप्त आहे. पंजाबच्या गव्हाचा भाव सरकारने ठरवला क्विंटलला २८० रुपये; बाजारात भाव चालला आहे क्विंटलला ३३० रुपये. पण, सरकारने व्यवस्था अशी केली की अडत्यांनी आणि खाजगी व्यापाऱ्यांनी गव्हाच्या मंडीमध्ये येताच कामा नये; म्हणजे मग शेतकऱ्यांना २८० रुपये भावाने गहू सरकारला विकणं भाव पडावं. सगळे लोक तक्रार करत असतील, पण मला सांगायला आनंद वाटतो की, आमच्या संघटनेमुळे गव्हाची पुरेशी वसुलीहोऊ शकली नाही. यंदा आम्ही थोडं कमी पडलो, पण केंद्र शासनाचं हे धोरण पुढे असंच चालू राहिलं तर पंजाबमध्ये पुढच्यावेळी एक पोतंसुद्धा गहू सरकारी खरेदीयंत्रणेला मिळू नये अशी व्यवस्था करण्याचा आम्ही प्रयत्न करू. २८० रुपयांच्या ऐवजी शेतकऱ्यांना ३३० रुपये मिळू नये अशी

सरकारने व्यवस्था केल्यामुळे वसुली कमी झाली, त्यावर सरकारने काय उपय केला? त्या सरकाने क्विंटलमागे ५५६ रुपये खर्च करून कॅनडातून गहू आणून आमच्या देशामध्ये ओतला. सुधाकरराव, आम्हा शेतकऱ्यांच्या-वतीने, दिल्लीला जाऊन कोणी विनम्रपणे म्हणेल का की तुम्ही पीएल् ४८० इतकी वर्षे चालवले, त्याने काही देशातला गव्हाचा प्रश्न संपला नाही; वसंतराव नाईकांनी जेव्हा हरित क्रांतीची सुरूवात केली आणि शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले तेंव्हा गव्हाचा प्रश्न संपला आणि आम्ही अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो. पं. नेहरूंच्या काळातला पीएल् ४८० चा करंटेपणा करू नका, असे तुमच्यापैकी कुणी म्हणेल का?

दिल्लीमधला एक जण असं म्हणाला. कोणाही पक्षीय माणसाला जे समजलेलं नाही किंवा समजलं तरी बोलायची हिम्मत नाही ते, जे पक्षीय राजकारणातील नाहीत असे अर्थमंत्री मनमोहन सिंग म्हणाले. ते म्हणाले, ''एक वर्ष फक्त मला द्या. चलनवाढीचा प्रश्न इतका गंभीर आहे की आजच्या काळामध्ये काही गोष्टी करणे मला भाग आहे. पण एक वर्षानंतर माझं धोरण शेतकरी- अनुकूल होतं की नाही तुम्ही ठरवा आणि तुम्हाला जर वाटलं की मी शेतकरी-अनुकूल नाही तर तुम्ही सांगाल ती शिक्षा भोगायला मी तयार आहे.'' जो मनुष्य पक्षीय राजकारणातला नाही तो हे बोलू शकतो तर मग आम्ही शेतकऱ्यांनी निवडून दिलेले तुम्ही आमचे नेते हे का बोलत नाहीत?

आज, प्रश्न काही फक्त गव्हाच्या आयातीचा नाही. १० लाख टन गव्हाची आयात झाली आहे. अजून १० लाख टन होणार, असं म्हणतात. गेल्या आठवड्यातील वर्तमानपत्रातील बातम्यावरून कळतं की ५० हजार टन पामोलिन तेल फुकट आणायचं ठरलं आहे. आणि ज्या दूध महापूर योजनेने देशातल्या दूध योजनेचे वाटोळे केले - म्हणजे परदेशातून दूध पावडर व लोणी आणून त्याचं दूध करून इथल्या दुधाचे भाव पाडले व इथल्या दूधयोजनेची हानी केली - ती योजना पुन्हा चालू झाली आहे, दूधमहापूर योजना - ३ या नावाने. पुन्हा एकदा युरोपवाल्यांनी आपल्याला दिलेलं लोणी आणि दूधपावडर इथं आणून इथल्या शेतकऱ्यांचे भाव पाडण्याचा कार्यक्रम चालू झाला आहे.

इथं एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेतला पाहिजे. युरोपमध्ये तिथली सरकारे शेतकऱ्यांना दुधाला अत्यंत चांगला भाव देतात. त्यामुळे दुधाचे अतोनात उत्पादन होते. दुधाच्या नद्या वाहातात आणि लोणी व चीजचे डोंगर तयार होतात, कोठे साठवावे त्यांना कळत नाही. हा ज्यादा झालेला माल ते हिंदुस्थानसारख्या देशाला द्यायला तयार होतात पण दुधाचा भाव कमी करायला तयार होत नाहीत. तुम्ही जास्त पिकवा, जास्त भाव घ्या, दुधाचं काय करायचं ते आपण नंतर बघू, असं युरोपीय सरकारे म्हणतात. आणि आमच्या देशाचे करंटे राज्यकर्ते म्हणतात, "तुमचे ते जादा दूध, आम्हाला द्या, आम्ही आमच्या देशातल्या दुधाचे भाव पाडतो." अशा तऱ्हेने परदेशातील दुधाच्या साहाय्याने 'दूध' म्हणून लिहिलेल्या गाड्या फिरायला लागल्या आणि ठिकठिकाणी शीतकरण यंत्रे बसवली की म्हणायचे दूध-क्रांती झाली!

खरं तर महाराष्ट्राने दुधाची क्रांती शेतकऱ्यांच्या साहाय्याने करून दाखविली. त्यासाठी अनेक कार्यकर्त्यांनी कष्ट घेतले. पण, गुजरातसारखी अनुकूल परिस्थिती नसतांना महाराष्ट्रात दुधाची क्रांती झाली याचे कारण महाराष्ट्रातल्या शासनाने दुधाच्या किंमतीच्या धोरणाबद्दल जागरूकता दाखविली आणि त्याचं श्रेय पहिलं दूधभाताचं आंदोलन करणाऱ्या शेतकरी संघटनेलाच आहे.

आता, इतकं सरळ सरळ शेतकरीविरोधी धोरण केंद्र शासन राबवत असतांना, 'हे धोरण चुकीचं आहे' इतकंसुद्धा शेतकऱ्यांनी निवडून दिलेले प्रतिनिधी का बोलत नाहीत? शेतकऱ्यांनी तुम्हाला नेते म्हणून निवडलं आहे, तुम्ही मंत्री व्हा, मुख्यमंत्री व्हा, उद्या तुमच्यापैकी कुणी पंतप्रधानाच्या जागेकडेही जातील. पण, पंतप्रधानाच्या जागेकडे जाणारा सर्वात चांगला मार्ग जो आहे तो शेतकऱ्यांच्या आशिर्वादातून जातो, दिल्लीच्या मर्जीतून नाही. स्व. वसंतराव बारा वर्षे मुख्यमंत्रीपदी राहिले, ते कशामुळे राहिले? त्यांची प्रेरणा शेतकऱ्यांच्या हिताची होती, म्हणूनच राहिले. पण, ते जसे शेतकऱ्यांचे हरितक्रांतीच्या टप्प्यातील शेवटचे नेते होते तसे, आज सुधाकररावांनी मुख्यमंत्री म्हणून काही बदल केला नाही तर मला दुर्दैवाने म्हणावे लागेल की, महाराष्ट्राचे शेवटचे मुख्यमंत्री होते. त्यानंतर, महाराष्ट्रात मुख्यमंत्री झाले नाहीत, दिल्लीहून महाराष्ट्र प्रांतावर सुभेदाराची नेमणूक व्हायला लागली. पण, सुभेदार कुठपर्यंत वर जाणार त्याच्या काही मर्यादा आहेत. पण, जर का तुम्ही इथल्या सगळ्या शेतकऱ्यांचे आशिर्वाद घ्याल तर दिल्लीमध्ये अशी कोणतीही ताकद नाही की जी तुम्हाला सांगू शकेल की तुम्ही आता इथून निघा. यामुळे निदान, त्या खुर्चीबरोबर शेतकऱ्यांचेच नव्हे तर साऱ्या देशाचे कल्याण केल्याचे समाधान मिळेल. कुणाच्या तरी वशिल्याने, कुणाच्या तरी चपला उचलल्या म्हणून किंवा कुणाचे तरी पाय पुसले म्हणून मुख्यमंत्री राहिलो असे म्हणण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या सेवेमधला गावपातळीचा कार्यकर्ता राहाण्यामध्ये समाधान आहे असे जो मानील तो मोठा. स्व. वसंतरावांची प्रतिम व प्रेरणा ही होती.

सुधाकररावांनी पाण्याचा एक प्रश्न मांडला आणि पाण्याचा प्रश्न खरोखरीच गंभीर आहे. यंदा आता पाऊस पडला आहे. पुसद भागात चांगला झाला आहे, पिकं खरंच सुंदर आहेत. पुढं काय होतं माहीत नाही. पण, आमच्या पुणे भागातला पाऊस आजवर असा आहे की विहिरींना अजून पाणी लागलेलं नाही. जर का आता पावसाने रजा घ्यायची ठरवली तर यंदा बहुतेक फेब्रुवारीपासूनच सुधाकररावांना दुष्काळाचा आणिबाणीचा कार्यक्रम राबवावा लागणार आहे. हे आत नेहमीचंच झालं आहे. अजूनही काही भागात टँकरने पाणी पुरवावं लागतंच आहे.

पण, जरा पावसाने डोळे वटारले की दुष्काळ झालाच. मग, 'पाणी अडवा, पाणी जिरवा' सुरू. ठीक आहे. पण या मुद्द्याचा विचार करायच्या आधी मला आपल्यासमोर एक प्रश्न ठेवायचा आहे. चांगला पाऊस पडला, खूप भाजीपाला आला, धनधान्य आलं की सगळेजण खूष होतात. डॉक्टर, वकीलमंडळीसुद्धा म्हणतात, ''वा! यंदा वाटाणा काय छान आलाय आणि किती स्वस्त आहे!'' पाऊस पडाला म्हणजे सगळ्यांना आनंद होतो, पण पाऊस चांगला पडला नाही, दुष्काळ पडला म्हणजे जागोजागी दगड फोडायची जी काही केंद्र निघतात त्या केंद्रांवर हाताला पदर गुंडाळून, रक्त येत असलं तरी पुन्हा पुन्हा फडकं बांधून हातोडीनं दगड फोडायला जमणाऱ्या फक्त शेतकरी बाया आणि शेतकरी पुरूष असतात. ओला कंच हिरवागार वाटाणा आला म्हणजे आनंद मानणाऱ्यांपैकी कोणीसुद्धा तिथं दगड फोडायला येत नाही.

दुष्काळाचा प्रश्न समजावून घ्यायचा असेल तर त्याचं मूळ सूत्र इथे शोधलं पाहिजे. कोणी वाणी, कोणी पोलिस शिपाई, कोणी पोस्टातला पोस्टमन, मंत्रालयातला कुणी कारकून असं म्हणत नाही की, ''यंदा काय करावं? दुष्काळ पडला आहे, तेव्हा आपल्याला आता थोडा काळ ही नोकरी सोडून खडी फोडायला गेलं पाहिजे.'' दुष्काळ पडला म्हणजे खडी फोडायची पाळी फक्त शेतकऱ्यावरच येते. तुम्ही विजेच लोड शेडिंग केलं तर कारखानदार काय म्हणतो? ''ठीक आहे, दोन महिने कारखाना बंद ठेवू, कारखान्याचं तेलपाणी करू आणि अशी काही व्यवस्था करू की वीज चालू झाली म्हणजे आपल्याला दुप्पट उत्पादन करता येईल. आणि दहा महिनेच कारखाना चालला म्हणून भाव असा काढू की बारा महिन्यांचा खर्च त्यातून निघेल.'' शेतकरी असं का म्हणू शकत नाही की, ''बरं झालं बुवा, यंदा पाऊस नाही पडला. मला बरीच भांडवली कामं करायची होती. बांधबंदिस्तीची, जमिनीची. यंदा मी ती उरकून घेतो. गेल्या वर्षीच्या पिकापैकी माझ्या खाण्यापुरते शिल्लक आहे, दोन पैसेही शिल्लक आहेत, गरज लागली तर. काय चिंता आहे?''

शेतकरी असे म्हणू शकत नाही; कारखानदार म्हणू शकतो, कामगार म्हणू शकतो. जरा का पावसाने डोळे वटारले की शेतकऱ्यांच्या मात्र पोटामध्ये गोळा उठतो की, ''अरे, यंदा पुन्हा बायकापोरांना घेऊन रोजगार हमीच्या कामावर जायची वेळ येणार आहे.''

दुष्काळाचा प्रश्न सोडविण्याकरिता अण्णासाहेब हजारेंनी त्यांच्या गावामध्ये काम केलं आहे. इतरही अनेक गावांमध्ये तसं काम करता येईल. काही मंडळी असंही सांगतील की झाडी लावल्यामुळे पाऊस चांगला पडतो, म्हणून झाडी लावा. तसं, हल्ली झाडी लावणं हा बराच किफायतशीर 'धंदा' झाला आहे. मी दहा वर्षांपासून सांगतो आहे की झाडी लावल्याने पाऊस वाढतो ही कल्पना चुकीची आहे. तुकाराम महाराजांच्या काळी दुर्गादेवीचा दुष्काळ पडला होता. तेरा वर्षे महाराष्ट्रात एक थेंब पाऊस पडला नाही. त्यावेळी महाराष्ट्रात सगळीकडे जंगलच जंगल होतं ना?

दुष्काळ ही गोष्ट इतकी साधी सोपी नाही. तो का पडतो हे सांगणं अजून कुणाला फारसं जमलेलंही नाही. पण, अलिकडे हवामान शास्त्राचे तज्ज्ञ वसंतराव गोवारीकरांनीही हे मान्य केलं की जंगलवाढ आणि पाऊस यांचा इतका काही प्रत्यक्ष संबंध नाही. पाणी उपलब्ध करण्याकरिता काही युक्त्या करता येतील. पाणी अडवता येईल, पाणी जिरवता येईल, बांधबंदिस्ती, नालाबंडिंग करता येईल.

पण, शेवटी एक लक्षात ठेवलं पाहिजे की आमचा प्रदेश काही बारमाही पावसाचा नाही; आमचा प्रदेश मान्सूनच्या पावसाचा आहे. इथं मान्सूनचा पाऊस कधी पडेल, किती पडेल, कसा पडेल याचा कुणालाही भरवसा देता येत नाही. सातआठ वर्षांमध्ये एखाददुसरं वर्ष, चांगल्या पावसाचं येतं, दोनतीन वर्षं बऱ्या पावसाची येतात, एकदोन वर्षं वाईट पावसाची येतात एवढाच साधारणपणे अंदाज आहे. आपण जरी सगळं पाणी अडवायची आणि जिरवायची व्यवस्था केली तरी त्यामध्ये काय होईल? खरंच जर दुष्काळ आला तर या पाणलोटक्षेत्र योजनांच्या भागामध्ये महिना दीडमहिना तगून राहायला मदत होईल, इतकंच. ही योजना राबविली म्हणजे आपण पाण्याच्या बाबतीत 'विमा'उतरवला, असं काही होणार नाही.

तर मग, काय केलं पाहिजे? स्विझर्लंडमध्ये सहा महिने बर्फ पडतो. या सहा महिन्यांत तिथे शेतकरी काहीच शेती करू शकत नाही. आणि तरी तिथला शेतकरी चांगला राहातो, शहरातल्या माणसांसारखा. हे कसं जमतं? मघाशी सांगितल्याप्रमाणे, यूरोपामध्ये शेतीमालाला, दुधाला चांगली किंमत देण्याची व्यवस्था आहे. ही व्यवस्था अशा करता की सहा महिन्यांच्या शेतीमध्येसुद्धा त्या शेतकऱ्याला वर्षभर सन्मानाने आणि माणूस म्हणून जगात आले पाहिजे. आपल्याकडे सात वर्षात एकदा दुष्काळ पडणार असेल तर आपल्याला योजना अशी करावी लागेल की सातव्या वर्षी शेतकऱ्याला दगड फोडायला जावे न लागता शहरातल्या माणसाप्रमाणे, मुंबईतल्या माणसाप्रमाणे, फारशी चिंता न बाळगता जगात येईल. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' सारख्या योजनांना माझा विरोध नाही. त्या योजनाही राबवायला पाहिजेत. पण त्यामुळे दुष्काळाचा प्रश्न सुटणार आहे असं जर कुणी सांगू लागलं तर ते खोटं आहे.

या अडवून जिरविलेल्या पाण्याबरोबरच दुसरी काही व्यवस्था होणार आहे का की ज्यामुळे सहा वर्षांच्या पावसामध्ये शेतकऱ्याला सात वर्षे जगता येईल? हा मुद्दा महत्त्वाचा आहे. यंदा पावसाची इतकी कठीण परिस्थिती झाली तरी मुंबईच्या जीवनावर अगदी शेवटी शेवटी त्याचा परिणाम झाला, तोही आता अगदीच प्यायला पाणी मिळणार नाही म्हणून. दुष्काळाच्या विदारक स्वरूपाची जणीव मुंबईला काही झाली नाही. आम्ही जर एकाच राष्ट्राचे घटक असू, मुंबई हे काही वेगळं राष्ट्र नसेल, दिल्ली हे काही वेगळं राष्ट्र नसेल आणि पुसद व 'गहुली' चे लोकसुद्धा त्याच राष्ट्राचे सदस्य असतील आणि पावसाने डोळे वटारल्यानंतर मुंबईच्या ख्यालीखुशालीत काही फरक नाही, पण गहुलीच्या लोकांनामात्र चिंता पडते असं जर असेल तर दोष इथं आहे. दुष्काळ हा निसर्गनिर्मित नाही तर तो मानवनिर्मित आहे. कारण, सहा वर्षांच्या पिकांमध्ये सात वर्षे शेतकऱ्याला जगता येत नाही हे त्याच्यातलं सूत्र आहे. दुष्काळाचे कायमचे निर्मूलन करायचे असेल तर नुसतं 'पाणी अडवा, पाणी जिरवा' नं भागायचं नाही, कुणी तरी सांगितलं म्हणून झाडी लावूनही पुरायचं नाही; त्याकरता, सहा वर्षांच्या पिकावर शेतकऱ्याला सात वर्षे निचिंतपणे जगता येईल असे धोरण आखले पाहिजे.

आणखी, कापूस एकाधिकार खरेदी योजनेबद्दल मी बोलू इच्छितो. कारण, स्व. वसंतरावांच ते मोठं श्रेय आहे. एके काळी म्हटलं जात होतं की विदर्भातलं हे पांढरं सोनं व्यापारी लुटून नेतात. जवाहरलालजी दर्डांनी म्हटलं की व्यापाऱ्यांच्या पद्धतीत उपरण्याखाली हात घालून कापसाचा भाव ठरतो आणि मग शेतकरी लुबाडला जातो. पूर्वी गावोगावी एकेका आडतीवर एकेका उपरण्याच्या खाली एका व्यापाऱ्याचा आणि एका आडत्याचा हात जात असे आणि गुपचुप भाव ठरत असे; त्याच्या ऐवजी आता परिस्थिती अशी निर्माण झाली की एकाच देशव्यापी उपरण्याखाली, कृषिमूल्य आयोगाच्या, दिल्लीला कोण कोण हात घालतो कुणाला ठाऊक? पण, कापसाचा भाव तिथं ठरतो. म्हणजे, पूर्वी चुकूनमाकून लाख दीडलाख व्यापाऱ्यांपैकी पाचदहा व्यापारीतरी शेतकऱ्याला बऱ्यापैकी भाव देत असतील, पूर्वी व्यापारी लहान लहान सुऱ्यांनी शेतकऱ्यांच्या माना कॉपीत असतील, तर आता या नवीन योजनेप्रमाणे दिल्लीला शेतकऱ्यांच्या माना कापणारा एक

अत्याधुनिक कत्तलखाना चालू झाला आहे. आणि त्यामुळे शेतकऱ्यांच्या सरसकट माना कापण्याची व्यवस्था झाली आहे. स्व. वसंतराव नाईकांची ही प्रेरणा होती का? नाही. या योजनेची सुरूवातीच्या दोन वर्षांच्या काळातील कामगिरी याची ग्वाही देते. पण, १९८६ साली केंद्र सरकारने फतवा काढला की कापूस एकाधिकार खरेदी योजनेतील कापसाचा हमी भाव आधारभूत किंमतीपेक्षा जास्त असता कामा नये. मग, एकाधिकाराची मक्तेदारी शेतकऱ्यांनी कशाकरता मान्य करायची? मोठी दुर्दैवाची गोष्ट अशी की तत्कालीन मुख्यमंत्री किंवा पक्षांचे पुढारी यांपैकी कुणीही या प्रश्नावर आवाज उठवायला पुढे आला नाही. आम्ही शरद पवारांना म्हटलं, शंकरराव चव्हाणांना म्हटलं की केंद्राचा हा जो फतवा आहे तो तुमच्या योजनेच्या विरुद्ध आहे. आपण बरोबर जाऊ किंवा आम्ही बरोबर नको असल्यास तुम्ही एकटे जा आणि हा फतवा योग्य नाही असं केंद्र सरकारला सांगा. पण, कुणी तयार नाही. मनात भीती, जर का कापसाच्या भावाबद्दल तक्रार केली तर मग आपल्या भाच्याला मिळायचं ते तिकिट मिळेल किंवा नाही याची खात्री सांगता येणार नाही.

कोणाला राग यावा किंवा कोणाला टोचून बोलावे म्हणून मी हे बोललो नाही. पण, शेतकऱ्यांच्या हिताचं काही करायचं असेल तर त्या मार्गातले हे जे धोंडे आहेत ते दूर केले पाहिजेत. या शेतकऱ्यांच्या पोरांनी आम्हा शेतकऱ्यांचे फार नुकसान केलं आहे. शेतकऱ्याचा पोरगा मंत्रालयात गेला आणि त्याला एकदा का त्या गालिचावर चालायची सवय लागली की त्याला कापसाला काय भाव मिळतो त्याची पर्वा राहात नाही, उसाला काय भाव मिळतो याची पर्वा नाही. त्याचं डोकं वेगळ्याच दिशेनं चालत असतं. अजून वरच्या जागी कसं जायचं आणि सध्याच्या मुख्यमंत्र्याच्या पायात पाय घालून त्या जागेवर आपला क्लेम कसा लावायचा याची चिंता त्याला पडलेली असते. मग, केंद्राच्या धोरणाविरूद्ध तो बोलत नाही. स्वतः मोठं होण्याकरिता या, शेतकऱ्यांची पोरं असलेल्या पुढाऱ्यांनी शेतकऱ्याला दावणीला बांधून त्याचं शोषण कसं होईल या दिल्लीच्या योजनेला हातभार लावला. असं करून काय मिळवलं? कुणीही त्यांच्यातला मोठा झाला नाही. मुंज नावाच्या राजाला कालिदासानं एकदा म्हटलं की, ''बा मुंजा, आजपर्यंत फार मोठेमोठे राजे होऊन गेले, पण त्यांच्या एकाच्याही बरोबर काही पृथ्वी गेली नाही तू राज्य मिळविण्याकरिता आणि टिकविण्याकरिता एवढी कटकारस्थानं करतोस, कुणास ठाऊक, कदाचित् ही पृथ्वी तू गेल्यानंतर तुझ्याबरोबर स्वर्गात येणार असेल!''

ज्यांनी ज्यांनी दिल्लीला जाऊन शेतकऱ्यांचं ईमान विकलं त्यांचे हात कुठे आभाळाला लागले नाहीत. आज लोक स्वयंस्फूर्तीने, स्वयंप्रेरणेने येतात ते स्व. वसंतराव नाईकांना श्रद्धांजली वाहायला येतात. मोठी माणसं कोण होतात? मुख्यमंत्री खूप झाले. मी हिंदुस्थानात येऊन आंदोलन करायला लागल्यापासून किती मुख्यमंत्री झाले याची यादी करायला बसलो तर आठवतसुद्धा नाही. आता प्रवासात कुठे त्यांच्यापैकी कुणी भेटले की आठवतं, मुख्यमंत्री असतांना त्यांचा काय थाट असायचा. वाटेने मुख्यमंत्री खूप पडलेत. पण आठवण होते वसंतराव नाईकांची.

आज आम्हाला आठवण होते जोतिबा फुल्यांची. जोतीबा फुले गव्हर्नर जनरलच्या दरबारात खांद्यावर घोंगडं टाकून गेल्याची गोष्ट सगळ्यांनाच ठाऊक आहे. त्यावेळी गव्हर्नर जनरल कोण होता हे कोणाला आठवतं का? तो तर त्यावेळी थाटमाटात दरबारात बसला होता. जोतिबा फुले घोंगडं खांद्यावर टाकून गेले होते. आज जयजयकार होतो जोतिबा फुल्यांचा, आज जागोजाग पुतळे उभे आहेत जोतिबा फुल्यांचे. त्या गव्हर्नर जनरलचं नावसुद्धा कुणाच्या लक्षात नाही. मुख्यमंत्री अनेक होऊन गेले, विसरले जातील. त्यांची नावं इतिहासात राहाणार नाहीत. पण वसंतराव नाईकांचं नाव इतिहासात रहाणार आहे. त्यात कदाचित् हेही लिहिलं जाईल की मधल्या बारा वर्षांच्या काळात ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीही होते. त्यांचे मोठेपण मुख्यमंत्री पदात नाही, महाराष्ट्राच्या नेतेपदात आहे.

आणि जर का असा कुणी नेता आम्हा शेतकऱ्यांना मिळाला की राजकारणात राहून का होईना, पण शेतकऱ्यांची बाजू घेणारा, पाऊस पडत नाही म्हटल्यावर चिंतीत होणारा, विलंबाने येणारा पाऊस आला म्हटल्यावर मंत्रालयात मुख्यमंत्र्यांच्या खोलीतसुद्धा दोनशे रूपयांचे पेढे वाटणारा– तर तो आम्हाला हवा आहे. 'वसंतराव नाईक' पुन्हा इथं यावा या अपेक्षेने मी पाहातो आहे असं मी सुधाकररावांच्या पत्रात म्हटलं आहे आणि तीच अपेक्षा मी इथं व्यक्त करतो.

आम्ही कोणीही आंदोलन करण्याकरिता जन्माला आलो नाही. मी काही आंदोलन करणारा म्हणजे तरूणपणापासून झिंदाबाद, म्हणत ओरडणारा मनुष्य नाही. ४०/४५ वर्षांच्या सरकारी आणि संयुक्त राष्ट्रातील नोकरीनंतर मी जेव्हा शेती करायला लागलो आणि मी असं पाहिलं की शेतकरी म्हणून इमाने इतबारे राबूनसुद्धा माझं दररोजचं भागू नये आणि दुष्काळ आला म्हणजे मला खडी फोडायला जावं लागावं अशा जाणीवपूर्वक योजना व धोरणं आखली जात आहेत तेव्हा त्याविरूद्ध उठण्याखेरीज गत्यंतर नाही, म्हणून मी या मार्गाला लागलो.

सुधाकरराव, तुम्ही जर हा शेतकऱ्यांचा प्रश्न उठवला तर या कामातनं मी मोकळा होईन आणि शेतकऱ्यांना एक दिवस सांगू शकेन की आता आपल्याला आंदोलन करण्याची गरज नाही. कारण, शेतातला शेतकरी राजा झाला आहे. एवढं सांगायला मिळावं आणि मग निवृत्त व्हायला मिळावं एवढी एक इच्छा स्व. वसंतराव नाईकांच्या पुण्यस्मृतीच्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपल्या सगळ्यांच्या साक्षीने करतो.

■■■

# ऑलिंपिकमधील अपयशाच्या निमित्ताने -

१९९२ चे ऑलिंपिक खेळ नियमाप्रमाणे आले, खेळले गेले आणि संपले. नियमाप्रमाणे भारतीय खेळाडू हात हलवित गेले आणि तेथे बर्सिलोनात केलेल्या खरेदीने भरलेल्या बॅगा घेऊन परत आले; पदके कोणतीही मिळण्याची अपेक्षाच नव्हती, त्याप्रमाणे मिळाली नाहीत!

७० देशांना ७१५ पदके मिळाली त्यात जुन्या समाजवादी देशांच्या संघास सर्वात जास्त म्हणजे ११२ आणि अमेरिकेस १०८ हे एक टोक तर दुसऱ्या टोकास पाकिस्तान आदि ११ देशांना फक्त १-१ कांस्यपदक.

एकही पदक भारतीय संघास नाही याबद्दल खूप आरडाओरड झाली. खेळाच्या क्षेत्रातील लोक सध्यातरी मूग गिळून आहेत. बाकी सर्व क्षेत्रातील लोक भारताच्या अपयशाबद्दल तळतळाट, संताप, निषेध इ. इ. भावना व्यक्त करीत आहेत. केन्द्रीय क्रीडामंत्र्यांनी ऑलिंम्पिक खेळात शोभून दिसल्या असत्या अशा चपळाईने राष्ट्रीय क्रीडा धोरण लोकसभेमध्ये सादर केले. आणखी चार वर्षे आता या विषयावर फार खळखळ होणार नाही. चार वर्षांनी ॲटलांटा येथे १९९६ सालचे ऑलिंपिक खेळ होतील. त्यावेळीही भारतीय चमू एकही पदक न मिळवता परत येतील आणि पुन्हा काही काळ टीकेचा डोंब उठेल. दुष्काळाची लक्षणे दिसल्यावर दुष्काळावरील चर्चेचे वादळ उठते तसेच, ''नेमेची'' येणाऱ्या ऑललिंपिकच्या आसपास भारताच्या क्रीडाक्षेत्रातील नाकर्तेपणाबद्दल वादळ उठते, नंतर सारे सामसूम.

भारतीय खेळाडूंवर टीका करतांना सर्वांनी एका गोष्टीचे अवधान ठेवले पाहिजे, ते म्हणजे केवळ क्रीडाक्षेत्रातच नव्हे तर सर्वच क्षेत्रात आपल्या देशाची गत अशीच आहे. 'मदर तेरेसा' सोडल्यास कोणाही भारतीयास गेल्या कित्येक वर्षांत एकही नोबेल पारितोषिक मिळाले नाही. साहित्यात नाही, अर्थशास्त्रात नाही, कोणत्याही विज्ञानाच्या शाखेत नाही. कोण्याही भारतीयाने आपले नाव संशोधनात, संगीतात, रंगभूमीवर उंचावलेले नाही. भारताचा उच्चांक फक्त जास्तीत जास्त सिनेमे तयार करण्यात आहे. पण त्या शिणेमांची गुणवत्ता पाहिली तर हा अभिमानाचा विषय फारसा नाही. थोडक्यात, खेळाडूंना नावे ठेवण्याची पात्रता मिळविण्याइतकी कामगिरी दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रात झाली नाही.

पदके कोणत्या देशांना मिळाली? प्रत्येक देशाला मिळालेली पदके आणि त्या देशाची आर्थिक सामाजिक स्थिती यांचा संबंध लावणे तसे सोपे नाही. पण काही मुद्दे स्पष्ट दिसून येतात.

बर्सिलोना खेळात १७२ देशांनी भाग घेतला त्यापैकी १२५ देशांबद्दल विश्वसनीय आकडेवारी उपलब्ध आहे. बहुतेक समाजवादी देशांबद्दलची आकडेवारी उपलब्ध नाही. या १२५ देशांचे चार गट करता येतील.

| | दरडोई वार्षिक उत्पन्न (डॉलरमध्ये) |
|---|---|
| १) गरीब | ०-६०० पर्यंत |
| २) मध्यम | ६०० ते २४९० |
| ३) उच्च माध्यम | २४९० ते ७७५० |
| ४) श्रीमंत | ७७५० च्यावर |

पहिल्या गटांत ४३ देश मोडतात, यात भारतही आहे आणि चीनही आहे. भारत सगळ्या जगात गरीब देशांच्या यादीत २१ वा आहे. तर चीन २३ वा आणि पाकिस्तान २६ वा या ४३ देशातील ४० देशांनी एकत्र मिळून ९ पदके मिळवली, उरलेल्या ३ देशांनी ६८ पदके मिळविली त्यातील इंडोनेशिया ५, केनिया ८ चीन ५४. या ४३ देशापैकी प्रत्यक्ष पदके मिळवणाऱ्या देशांची संख्या फक्त ७ आहे.

मध्यम स्थितीतील ४१ देशांनी २१० पदके मिळवली. यात प्रामुख्याने रोमानिया (१८), पोलंड (१९), बल्गेरिया (१६) या तीन देशांनीच एकूण ५३ पदके मिळवली. या गटतील ४१ देशापैकी १६ देशांनी पदके मिळविली.

उच्च मध्यम गटात फक्त १७ देश येतात. १७ पैकी ८ देशांनी एकूण ७७ पदके मिळवली, त्यांत सिंहाचा वाटा द. कोरिया (२९) आणि हंगेरी (३०) यांचा आहे.

श्रीमंत गटात फक्त २४ देश आहेत. या २४ देशातील ४ देशांना पदके अजिबात मिळालेली नाहीत; हे देश म्हणजे सिंगापूर हाँगकाँग, अरब संघराज्य आणि कुवैत. उरलेल्या २० देशांनी ४१५ पदके मिळवली यात सर्वोच्च अमेरिकेत (१०८), जर्मनी (८२) हे महत्त्वाचे देश.

थोडक्यात, पदके मिळवण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक देशाची आर्थिक संपन्नता हा आहे. श्रीमंत गटातील २० देशांनी फार मोठ्या प्रमाणावर पदके मिळवली यावरून हे स्पष्ट आहे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा सामाजिक व्यवस्था हा दिसतो. समाजवादी व्यवस्था अर्थकारणात दिवाळखोर ठरली असली तरी खेळाच्या क्षेत्रात त्यांनी मिळवलेले प्राविण्य नेत्रदीपक आहे. समाजवादी राष्ट्रकूल (११२) सर्वोच्चपदी आहेच; पण त्याखेरीज क्यूबा (३१), हंगेरी (३०), रूमानिया (१८), झेकोस्लाविया (७), उत्तर कोरिया (९), बल्गेरिया (१६), पोलंड (१९) आणि इतर अशी सज्जड पदकांची कमाई या देशांनी केली आहे. आर्थिकदृष्ट्या पहाता हे सर्वच देश आज मोठ्या बिकट अवस्थेत आहेत आणि तरीही क्रीडा क्षेत्रात तेथील खेळाडू चमकले याचे श्रेय तेथील समाजव्यवस्था आणि शिक्षणपद्धती यांना द्यावेच लागेल.

कोणाला आवडो किंवा ना आवडो क्रीडानैपुण्यात काही मानववंश अधिक निपुणता दाखवतात असे केवळ बेर्सिलोनाच्याच नव्हे तर आतापर्यंतच्या सर्व ऑलिंपिकच्या स्पर्धात दिसून आले आहे. आर्यवंश शारीरिकदृष्ट्या सर्वश्रेष्ठ आहे हे दाखवण्याकरितां हिटलरने आग्रहाने बर्लिन येथे ऑलिंपिक सामने घेतले होते व त्या सामान्यातही निग्रो खेळाडूंनी आपले वर्चस्व सिद्ध केल्यामुळे हिटलरची मोठी निराशा झाली होती, हे इतिहासप्रसिद्ध आहे.

आर्थिक दृष्टीने अगदी कमकुवत असलेल्या निग्रो वंशांच्या देशांनी मोठी स्पृहणीय

(पान ८ वर)

# शेतकरी संघटना : कृतिसमिती बैठक वृत्तांत

## नांदेड दि. २४/२५ ऑगस्ट १९९२

- **सीता शेती प्रयोगकऱ्यांचे पत्ते संकलित करणे**
- **व्यापाराशी संबंधित कार्यकर्त्यांचे व हितचिंतकांचे पत्ते जमविणे**
- **लक्ष्मीमुक्ती अधिक व्यापक करणे**
- **केंद्रशासनाने अवलंबिलेल्या नेहरुतीनीचा निषेध**
- **३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर ९२ : जिल्हावार प्रचारयात्रा**
- **संघटकसाठी आजीव व वार्षिक वर्गणीदार नोंदविण्याचे अभियान**
- **१० नोव्हेंबर १९९२ रोजी वार्षिक मेळाव्याचा प्रस्ताव**

शेतकरी संघटनेने शेगाव मेळाव्यात जाहीर केलेला चतुरंग शेतीचा कार्यक्रम परिणामकारकरीत्या अंमलात आणण्याच्या दृष्टीने सीताशेती प्रयोगात भाग घेऊ इच्छिणाऱ्या शेतकरी स्त्रीपुरुषांचे, तसेच व्यापारशेतीच्या कार्यक्रमाची आखणी करण्यासाठी प्रत्यक्ष व्यापाराशी संबंधित असणारे शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते व हितचिंतक यांचे पत्रे एकत्रित करण्याचा निर्णय नांदेड येथे शेतकरी संघटनेच्या कृतिसमितीच्या २४ व २५ ऑगस्ट १९९२ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

शेतकऱ्यांनी चतुरंग शेतीच्या माध्यमातून शेती हा व्यवसाय म्हणून करायचे ठरवून देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्याची तयारी दाखविली असतांनासुद्धा, सुरुवातीला शेतकऱ्यांना निर्यातीचे आवाहन करणारे नरसिंहराव सरकार जुन्या नेहरूनीतीचाच अवलंब करून शेतकऱ्याला त्याच्या मालाला भाव मिळू देत नाही याबद्दल या बैठकीत तीव्र असंतोष व्यक्त करण्यात आला व देशातील शेतीमालाला कमी भाव देणे, देशातील शेतीमालाचे भाव खालच्याच पातळीवर राहावेत यासाठी परदेशातून भरमसाठ भावाने शेतीमाल आयात करून तो तेथील बाजारात ओतणे अशा नेहरूव्यवस्थेतील मार्गांचा अवलंब सध्याचे शासनही करीत आहे याची माहिती देण्यासाठी जिल्ह्याजिल्ह्यांतून ३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर १९९२ या काळात प्रचारयात्रांचे आयोजन करण्याचे ठरले. या प्रचारयात्रांत सीताशेती, माजघर शेती, व्यापार शेती आणि निर्यात शेती या शेतीव्यवसायाच्या चारही अंगांची माहिती देणे, शेतकरी संघटकचे वर्गणीदार वाढविणे, लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम जास्तीत जास्त गावात अमलात आणण्याची तयारी करणे या कार्यक्रमांबरोबरच कापूस एकाधिकार खरेदी योजनेतील अन्याय्य कपाती, शेतीमालाची अनावश्यक आणि चढ्या भावाने आयात, देशातील शेतकऱ्यांना भाव मिळू न देण्याचे शासनाचे कारस्थान, शेतीमालाच्या वाहतुकीवरील निर्बंध, शेतीमालाच्या प्रक्रियेवरील निर्बंध याबद्दल जनमत जागृत करण्यात येऊन, ही सर्व नेहरूवादी व्यवस्थेची अंगे आहेत म्हणून गावोगाव नेहरूवादाच्या पुतळ्याचे दहन करण्यात येणार आहे. २ ऑक्टोबर १९९२ रोजी या जिल्ह्याजिल्ह्यातील प्रचारयात्रांचा समारोप प्रत्येक जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाणी शेतकऱ्यांच्या जिल्हा मेळाव्याने होणार असून या मेळाव्यातही नेहरूनीतीच्या पुतळ्याचे दहन करण्यात येईल.

१० नोव्हेंबर १९९२ रोजी शेतकरी संघटनेचा वार्षिक मेळावा घेण्यात यावा असेही या बैठकीत सुचविण्यात आले. या मेळाव्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी ७ ऑक्टोबर १९९२ रोजी शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची एक विस्तृत बैठक औरंगाबादसारख्या ठिकाणी घ्यावी अशी विनंती शेतकरी संघटनेच्या अध्यक्षांना करण्यात आली.

३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर १९९२ या काळातील प्रचारयात्रेमध्ये प्रत्येक जिल्ह्याने शेतकरी संघटकचे किमान २०० आजीव वर्गणीदार व १००० वार्षिक वर्गणीदार नोंदवावे असा आदेश कृतिसमितीच्या या बैठकीने दिला.

शेतकरी संघटनेच्या अध्यक्षीय मंडळाचे अध्यक्ष श्री. विजय जावंधिया या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. अध्यक्षीय मंडळाचे इतर सर्व सदस्य – श्री. भास्करराव बोरावके, श्री. रामचंद्रबापू पाटील, सौ. सुमनताई अग्रवाल, सौ. विमलकाकू पाटील तसेच शेतकरी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष श्री. किशोर माथनकर हेही या बैठकीस हजर होते. बैठकीचे आयोजन व संचलन कृतिसमितीचे अध्यक्ष श्री. शकर धोंडगे यांनी केले.

बैठकीच्या सुरुवातीला सोमेश्वर (नाशिक) येथे झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत झालेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीसंबंधी आढावा घेण्यात आला. या निर्णयांची अंमलबजावणी विशेष समाधानकारकरीत्या न झाल्याबद्दल खेद व्यक्त करण्यात आला.

■■■

(पान ७ वरून)

कामगिरी करून दाखविली आहे. क्यूबा (३१), केनिया (८), इथिओपिया (३), जमैका (४), नायजेरिया (४), नामेबिया (२) याखेरीज ब्राझील, मेक्सिको इ. देशांच्या संघांचे यश त्यांच्या संघांतील श्यामवर्णीय खेळाडूंच्या मोठ्या संख्येमुळे मिळाले. यापलीकडे अमेरिकेला मिळालेल्या १०८ पदाकांपैकी निम्म्यावर पदके, विशेषतः धावणे, उड्या, इ. क्षेत्रातील बहुतेक सर्व पदके, त्यांना शामवर्णीय खेळाडूंमुळेच मिळाली. ऑलिंपिक स्पर्धांतील अमेरिकेचे स्थान तिच्या आर्थिक संपन्नतेमुळे तर आहेच पण त्याबरोबर त्या देशातील अश्वेतवर्णीयांच्या मोठ्या संख्येसही आहे.

पदके मिळविणाऱ्यात अश्वेत, श्वेत, पीत यांचीच मोठी गर्दी आहे. याउलट, चीन, जपान सोडल्यास उरलेल्या आशियाखंडातील लोक अध्यात्मिकदृष्ट्या स्वतःला श्रेष्ठ म्हणवत असतील आणि भारतातील लोक योग-सामर्थ्याचे कौतुक सांगत असतील तर अध्यात्मिक, योगिक ताकद, नियमाने परिश्रम, कसरत करणाऱ्या खेळाडूंच्या पासंगालाही पुरत नाही हे स्पष्ट झाले.

■■■

# नेहरूधोरण प्रतिमेचे दहन

जवळाबाजार : येथे शेतकरी संघटनेच्या वतीने स्वातंत्र्यदिनी नेहरूंच्या धोरणाचा निषेध म्हणून नेहरूधोरण प्रतिमेचे दहन शेतकरी हुतात्मा चौकात करण्यात आले.

सभेस मार्गदर्शन करताना साहेबराव नाना हट्टेकर व पुरुषोत्तम लाहोटी यांनी शेतकऱ्यांच्या विरोधात नेहरू-धोरण कसे वापरले जात आहे ते स्पष्ट केले. कार्यक्रमास संततधार पाऊस असूनदेखील परिसरातून ४०० लोक उपस्थित होते.

प्रतिमेचे दहन करीत असतांना पोलिसांनी पुरुषोत्तम लाहोटी, साहेबराव हट्टेकर, राजाराम नागरे, महादराव चव्हाण, शेषराव चव्हाण, प्रल्हाद वंजे, रामकिशन अप्पा रुद्राक्ष यांच्यासह ८० कार्यकर्त्यांस अटक करून लगेच सुटका केली.

कार्यक्रमास कोन्डसी, आसोली, पुरजळ, सिरला, तपोवन, आंजरसोडा, आरळ, चिखली, वडद, गुंडा, आडगाव, करंजी, टाकळगव्हाण, पोटा खु. इत्यादी ठिकाणाहून कार्यकर्ते आले होते.

प्रेषक : रामकिशन अप्पा रुद्राक्ष, जवळाबाजार

**जवळाबाजार येथे नेहरु धोरण प्रतिमेच्यादहन कार्यक्रमाच्या प्रसंगीचे छायाचित्र डावीकडून – १) पुरुषोत्तम लाहोटी २) राधेश्याम देशपांडे, ३) साहेबराव हट्टेकर ४) राजाराम कृष्णाजी ५) विनायक रा. रुद्राक्ष**

# नांदेड येथे क्रांतिदिनी नेहरूधोरण पुतळ्याचे दहन

**नेहरु प्रतिमेस उभे करून बाजीराव आडकिणे बाटलीतील पेट्रोल पुतळ्यावर टाकीत असून फोटोच्या डाव्या बाजूस शिवराज पाटील मसलगेकर हे प्रतिमेस आगपेटीने अग्नी देत आहेत.**

९ ऑगस्ट या क्रांतीदिनी नांदेड येथे, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केंद्रशासन शेतकऱ्याविरुद्ध राबवीत असलेल्या नेहरूवादी अर्थव्यवस्थेतील मार्गांचा निषेध म्हणून शेतकरी संघटनेच्या कृतिसमितीचे अध्यक्ष श्री. शंकर धोंडगे यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्ह्यातील निवडक कार्यकर्त्यांनी नेहरूवादाच्या पुतळ्याचे दहन केले. या प्रसंगी जिल्ह्यातील अनेक शेतकरी तसेच नांदेड शहरातील नागरिकही हजर होते. पोलिसांनी श्री. शंकर धोंडगे यांच्यासह १४ कार्यकर्त्यांना अटक करून थोड्या वेळाने सोडून दिले.

शेतीमालाला भाव मिळू न देणे, परदेशातून शेतीमालाची चढ्या भावाने आयात करणे, प्रक्रियेवर व वाहतुकीवर बंधने लादणे यासंबंधीच्या बातम्या जसजशा बाहेर येत आहेत तसतसा जिल्ह्यातील शेतकऱ्यांमधील असंतोष वाढतो आहे. या असंतोषाला वाचा फोडणारा कार्यक्रम आखण्यासाठी दि. २५ ऑगस्ट १९९२ रोजी नांदेड येथे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची बैठक झाली. या बैठकीत त्याआधी संपलेल्या कृतिसमितीच्या बैठकीतील निर्णयांची तंतोतंत अंमलबजावणी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आणि तेथेच ३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर १९९२ या काळासाठी जिल्हा प्रचार यात्रेच्या कार्यक्रमाची आखणीही करण्यात आली.

## एक उंदीर मारण्यास १४ रू. ४५ पैसे

*मुंबई महानगरपालिकेने एप्रिल १९९१ ते मार्च १९९२ या काळात आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत ८६ लाख ४४ हजार ३५२ रुपये खर्च करून ५ लाख ९८ हजार २९५ उंदिर मारले. सध्या शहरात सुमारे तीन कोटी उंदीर शिल्लक आहेत.*

*हे सर्व उंदीर या पद्धतीने संपायला किती वर्षे आणि किती रुपये लागतील? आणि त्या अवधीत उंदरांची ताज्या दमाची पिढी तयार होईल तिचे काय?*

*आधार - सकाळ : दि.१८/८/९२*

# शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती : एक पाहाणी

१९८२ साली संघटनेचा ओनामा (शेतकरी संघटना विचार आणि कार्यपद्धती) प्रसिद्ध झाला. त्यातला एक परिच्छेद पुढीलप्रमाणे –

"दारिद्र्याविषयी दुसरा महत्त्वाचा, लक्षात ठेवण्यासाठी मुद्दा म्हणजे कोरडवाहू शेतीतील दारिद्र्य हे वाढत आहे. ते कमी होत नाही आणि आहे तितकंचही राहात नाही. ४०/५० वर्षे वयाचे शेतकरी आहेत त्यांनी आठवून पाहावं की आपण १०/१२ वर्षाचे होतो तेव्हा आपल्या घरी दररोजच्या जेवणात काय काय असायचे? भाजीपाल्याचे कालवण किती वेळा असायचे? कालवणाला निदान दोन थेंब तेलाची फोडणी किती वेळा असायची? आपल्या घरांत आईला, आजीला धड लुगडी किती असायची? आणि आता हेच उलटे विचारून पाहू. आता स्थिती काय आहे? आपल्या घरातील १० वर्षाचे पोर, नातवंड जेवायला बसलं तर त्याच्या ताटात ताक, दूध, दही किती वेळा पडतं? घरातील स्त्रीला धड लुगडी किती असतात?"

१० वर्षानंतर १९९२ साली हाच प्रश्न पुन्हा एकदा स्वतःला विचारून पाहण्यासारखा आहे. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती गेल्या १० वर्षात भरपूर सुधारली आहे, एवढेच नव्हे तर ग्रामीण बाजारपेठ आता महत्त्वाची झाली आहे असे इंडियात तरी वारंवार म्हटले जाते. यात कितपत तथ्य आहे? हे तपासून पाहण्यासाठी कृषि योगक्षेम संशोधन न्यास आणि कृषि अर्थ प्रबोधिनी संयुक्तपणे एक अभ्यास करणार आहे.

या अभ्यासाची सुरुवात म्हणून एक प्रश्नावली तयार करण्यात आली आहे –

**ही प्रश्नावली ज्यांना शेतीखेरीज उदरनिर्वाहाचे किंवा उत्पन्नाचे साधन नाही अशाच शेतकऱ्यांनी भरून पाठवायची आहे.**

प्रश्नावली संपूर्णपणे व्यवस्थित भरून पाठवणाऱ्या शेतकऱ्यांना शेतकरी संघटकचा अंक एक वर्षभर विनामूल्य पाठवण्यात येईल. पाठवणारा शेतकरी अगोदरच वर्गणीदार असेल तर त्यांनी सुचवलेल्या दुसऱ्या कोणासही हा फायदा देता येईल किंवा त्यांची स्वतःची वर्गणी संपल्यानंतर एक वर्षपर्यंत हा फायदा त्यांना मिळू शकेल. (या बाबतीत वर्गणीदार क्रमांक जरूर लिहावा.)

प्रश्नावली भरायला अगदीच सोपी आहे. जिथे अशी चौकट दाखवली आहे तेथे नेमका आकडा भरावा असे अपेक्षित आहे. जेथे 'हो / नाही' असे छापलेले आहे तेथील योग्य तो शब्द ठेवून नको असलेला खोडून टाकावयाचा आहे.

ज्यांच्याकडे शेतकरी संघटक येत नाही पण ज्यांना ही प्रश्नावली भरून पाठवावयाची आहे त्यासाठी साबतच्या प्रश्नावलीची झेरॉक्स प्रत काढून ती वापरता येईल.

प्रश्नावली उशिरात उशिरा २० सप्टेंबर १९९२ पर्यंत पोष्टात पडणे आवश्यक आहे.

पत्ता : शेतकरी संघटक,
अंगारमळा,
आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

## सीताशेती – नावनोंदणी

सीताशेतीची घोषणा शेगांवच्या भव्य मेळाव्यात झाली. त्याविषयी एक शिबिर झाले. थोडेफार लिखाण आणि चर्चाही झाल्या. आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात करायची आहे.

सीताशेती हा एक शेतीतील शास्त्रीय संशोधनाचा प्रयोग आहे. पण तो प्रयोग विद्यापीठात कोंडलेला नाही आणि विद्वानांपुरता मर्यादित नाही. औषधांच्या आणि बीबियाणांच्या कंपन्या आपला माल खपावा म्हणून संशोधन करतात तसा प्रकार सीता शेतीत नाही आणि काही धार्मिक संस्था करतात त्या प्रमाणे अध्यात्मिक किंवा गोमातेची पूजनीयता असल्या सिद्धांतांनाही सीताशेती बांधलेली नाही. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रदेशांतील, वेगवेगळ्या पिकांच्या शेतकऱ्यांनी त्यांना पडलेले व्यावहारिक / व्यवसायिक प्रश्न सोडविण्याकरिता प्रयोग करावे, आपले अनुभव इतरांना सांगावे, इतरांच्या अनुभवाचा आपणही लाभ घ्यावा, आवश्यक तेथे सामूहिकरित्या तज्ज्ञांचा सल्लाही घ्यावा अशी ही कल्पना आहे.

सीताशेती हा प्रयोग प्रामुख्याने शेतकरी स्त्रियांनी करावा अशी कल्पना आहे. याचे कारण, व्यापार आणि निर्यात या क्षेत्रातील कामांचा मोठा बोजा पुरुष शेतकऱ्यांवर पडणार आहे. पण या कामात पुरुषांनीही रस घ्यावा आणि घरच्या मंडळींना उत्तेजन द्यावे, अडचणी येऊ देऊ नयेत अशी अपेक्षा आहे.

महाराष्ट्रात सीताशेतीचा प्रयोग हजारो शेतांत होईल. त्याचे संकलन करण्याची व्यवस्था आंबेठाण येथे करण्यात येत आहे. ही व्यवस्था दिवाळीनंतर शिस्तबद्ध पद्धतीने चालू होईल.

ज्या शेतकरी स्त्रियांना सीताशेतीच्या प्रयोगात सहभागी व्हायचे असेल त्यांनी आपले नाव, गाव, पत्ता, पाण्याचे साधन, शेतीचा आकार, सध्या घेत असलेली पिके ही माहिती कळवून आपले नाव नोंदवावे.

सीताशेती प्रयोग काही निश्चित समस्या सोडवण्याकरिता प्राथमिकता देऊन करावा लागेल. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने ज्या समस्यांकडे प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक आहे. अशा दोन तीन समस्यांची यादीही त्याबरोबरच कळवावी.

# शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती : एक पाहाणी

## ● प्रश्नावली ●

मी शपथपूर्वक सांगतो की, माझे किंवा माझ्या कुटुंबाचे चरितार्थाचे शेतीखेरीज दुसरे काहीही साधन नाही.

नाव : ________________________ वय : [ ] वर्षे

गाव : ____________ पोष्ट : ____________

तालुका : ____________ जिल्हा : ____________

सही :

| | | | १९८० मधील स्थिती | १९९२ मधील स्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | **शेतीचा आकार** | | [ ] एकर | [ ] एकर |
| २. | **कुटुंबातील माणसांची संख्या** | पुरुष | [ ] | [ ] |
| | | स्त्रिया | [ ] | [ ] |
| ३. | **जनावरे** : दुभती, शेतीची, लहानमोठी | | [ ] | [ ] |
| ४. | **पाण्याचे साधन** | | विहीर / कालवा / लिफ्ट / कोरडवाहू | विहीर / कालवा / लिफ्ट / कोरडवाहू |
| ५. | **पिके** (अन्नधान्ये, गळीत व इतर नगदी पिकांची नावे) | | | |
| ६. | **कर्ज** | | [ ] रुपये | [ ] रुपये |
| ७. | **गुंतवणूक** (बँक ठेवी, बचत सर्टीफिकेट, शेअर इ.) | | [ ] रुपये | [ ] रुपये |
| ८. | **खाद्यपदार्थ** (आठवड्यातून एकदा तरी) | | | |
| | क. | दूध | हो / नाही | हो / नाही |
| | ख. | दही | हो / नाही | हो / नाही |
| | ग. | तूप | हो / नाही | हो / नाही |
| | घ. | तळलेले पदार्थ | हो / नाही | हो / नाही |
| | च. | गोड पदार्थ | हो / नाही | हो / नाही |
| | छ. | फळभाज्या | हो / नाही | हो / नाही |
| | ज. | फळे | हो / नाही | हो / नाही |
| | झ. | अंडी | हो / नाही | हो / नाही |
| | ट. | मटण / कोंबडी | हो / नाही | हो / नाही |
| | ठ. | मासे | हो / नाही | हो / नाही |

येथे कापा

| | | |
|---|---|---|
| ९. **वापरायच्या वस्तू** | | |
| क. विजेचे दिवे | हो / नाही | हो / नाही |
| ख. रेडिओ | हो / नाही | हो / नाही |
| ग. टेलिव्हिजन | हो / नाही | हो / नाही |
| घ. सायकल | हो / नाही | हो / नाही |
| च. मोटार सायकल | हो / नाही | हो / नाही |
| १०. **दैनंदिन वापराच्या वस्तू** | | |
| क. दंतमंजन (विकतचे) | हो / नाही | हो / नाही |
| ख. टूथपेस्ट | हो / नाही | हो / नाही |
| ग. साबण (आंघोळीचा) | हो / नाही | हो / नाही |
| घ. तेल (केसांचे) | हो / नाही | हो / नाही |
| च. पावडर | हो / नाही | हो / नाही |
| छ. विडी / सिगरेट | हो / नाही | हो / नाही |
| ज. दारू | हो / नाही | हो / नाही |
| झ. वर्तमानपत्र / मासिक | हो / नाही | हो / नाही |
| ११. **मुलांचे कपडे लत्ते** | | |
| क. चड्डी | हो / नाही | हो / नाही |
| ख. पायजमा | हो / नाही | हो / नाही |
| ग. पँट | हो / नाही | हो / नाही |
| घ. सफारी | हो / नाही | हो / नाही |
| च. टोपी | हो / नाही | हो / नाही |
| छ. चपला | हो / नाही | हो / नाही |
| ज. बूट | हो / नाही | हो / नाही |
| १२. **मुलींचे कपडेलत्ते** | | |
| क. परकर पोलके | हो / नाही | हो / नाही |
| ख. साडी | हो / नाही | हो / नाही |
| ग. सलवार-खमीज | हो / नाही | हो / नाही |
| घ. मॅक्सी | हो / नाही | हो / नाही |
| च. चपला | हो / नाही | हो / नाही |
| छ. बूट | हो / नाही | हो / नाही |

# केंद्र सरकारचे पुन्हा, येरे माझ्या मागल्या

माणूस एखाद्या दुर्धर आजाराने पछाडला गेला, पण सुदैवाने ऐनवेळी चांगला डॉक्टर, वैद्य भेटला आणि रोगी मरता मरता वाचला म्हणजे काय होते? डॉक्टर रोग्याला औषधांची यादी लिहून देतात, त्याच्याबरोबर खाण्यापिण्याबद्दल कडक पथ्ये घालतात. त्याखेरीज कांही नियमित शारीरिक हालचाली व्यायाम इत्यादींसंबंधी शिफारशी देतात.

इस्पितळातून बाहेर आल्यानंतर काही दिवस रोगी औषधपाणी, पथ्ये सगळी व्यवस्थित पार पाडतो. त्यामुळे त्याच्या प्रकृतीतही बऱ्यापैकी सुधारणा झाल्याची लक्षणे दिसू लागतात आणि नेमके याचवेळी रोग्याकडून ढिलाई व्हायला लागते. औषधे नियमितपणे घेण्यात टंगळमंगळ होते. तेलकट तिखट अधूनमधून खाल्ले तर काय होते अशा युक्तिवादाने पथ्यपाणीही ढिले पडते. ही ढिलाई काही दिवस चालू राहिली की पुन्हा इस्पितळात जाण्याची वेळ पुढे येऊन ठाकते.

देशाच्या आर्थिक परिस्थितीसंबंधाने असेच होते आहे. दीडदोन वर्षापूर्वी अर्थव्यवस्था इतकी नाजूक अवस्थेला पोचली होती की ती टिकते किंवा नाही याचीच चिंता पडली होती. अगदी कठीण अवस्थेतल्या रोग्याला रक्ताची बाटली किंवा सलाईन लावावे त्याप्रमाणे अंतराष्ट्रिय नाणे निधीकडून आणिबाणीचे कर्ज घेतले आणि देशातील सोनेसुद्धां गहाण ठेवले; जीवावरचे संकट तर टळले.

मग डॉक्टरांनी काही उपाययोजना सुचवली. नोकरशाही कमी करा, खुल्या बाजारपेठेची अर्थव्यवस्था तयार करा, रुपयाची किंमत वास्तवाचे भान ठेवून ठरवा, चलन वृद्धि कमी करा, अंदाजपत्रकातील तूट आटोक्यात आणा वगैरे.

नवीन सरकार आले. त्यांनी ही सगळी उपाययोजना मान्य केली. रोग्याने अळमटळम करू नये म्हणून मनमोहनसिंगाच्या रूपाने देखरेखीसाठी सुश्रुषासेविकासुद्धा ठेवली आणि सुरवात तर चांगली झाली.

रुपयाचे अवमूल्यन करण्यात आले, परवाना व्यवस्था गुंडाळल्याच्या घोषणा झाल्या. अयातनिर्यातीची धोरणे जास्त सुलभ, कागदोपत्री तरी, झाली. नोकरशाहीवरील अवाढव्य खर्च आटोक्यात आणण्यासंबंधी काही थातूरमातूर घोषणा राणा भीमदेवी थाटात झाल्या.

जिवावार बेतलेले संकट टळलेले दिसले आणि तळीराम पुन्हा 'एकच प्याला' मागे लागणार असे दिसत आहे.

अवमूल्यन होऊनही आयातीत भरपूर वाढ झाली. त्या तुलनेने निर्यातीतील वाढ कमी आहे. गेल्या काही काळात आयातीवरील बंधने मोठी जाचक होती. त्यामुळे, आयातीतील वाढ समजण्यासारखी आहे. निर्यात क्षेत्रातील अपयश मात्र गंभीर आहे.

शेअर बाजारातील 'हर्षद मेहता' तेजीमुळे परदेशस्थ भारतीय इकडे पैसा पाठवत होते तो पाठवणे त्यांनी बंद केले आहे, एवढेच नव्हे, त्यांच्या येथील ठेवी परत जाऊ लागल्या.

महागाई काहीशी स्थिरावली आहे, पण चलनवृद्धीच्या वाढीची गती कमी झाली आहे या विधानात आकडेवारीच्या हातचलाखीच्या काही भाग आहे.

पतपुरवठ्यावरील निर्बंध आणि शेअर बाजारातील घोटाळ्याचा परिणाम म्हणून बँकींग व्यवस्था इतकी अडचणीत आली आहे की त्याचा परिणाम सर्व उद्योगधंदे आणि व्यापाऱ्यांना जाणवू लागला.

परिणामतः, दोन वर्षापूर्वीच्या आजारातून उठतांना अर्थव्यवस्था सुधारण्याबद्दल जी निदान वैचारिक स्पष्टता होती ती संपत आली आहे. नेहरूपठडीतील राजकारणी स्वदेशीच्या नावाखाली स्वार्थ साधणारे आणि नेहरू व्यवस्थेत गडगंज कमावलेले कारखानदार, गलेलठ्ठ पगारांना सोकावलेले नोकरदार आणि संघटित कामगार इत्यादींनी नव्या अर्थव्यवस्थेच्या यज्ञाच्या घोड्यास रोखून धरले आहे.

खुल्या बाजारपेठेच्या व्यवस्थेचा फायदा घेण्याचा वकूब इंडियन कारखानदारात कधीच नव्हता आणि नजिकच्या भविष्यकाळात अशी कुवत त्यांच्यापाशी येण्याची शक्यता नगण्य आहे. खुल्या अर्थव्यवस्थेचा फायदा घेण्याची आणि देशाला परकीय चलन मिळवून देण्याची ताकद फक्त शेतकऱ्यात आहे. पण नवीन अर्थव्यवस्था शेतकऱ्यांना लागू करण्याची केन्द्र शासनाची इच्छा नाही. असे हे सगळे त्रांगडे बनले आहे.

कारखानदारीचे मोडके घोडे, त्याला कितीही चुचकारले, पिदाडले किंवा तोबरा दाखवला तरी ते काही उठून दौडू लागत नाही. मग, नाकर्त्या सरकारला कर्तबगारी दाखवण्याला वाव फक्त एकाच जागी. बाहेर बाजारात मान नसलेला शेतकरी घरी येऊन कारभारणीलाच शिव्या, लाथा घालतो असा हा प्रकार आहे!

अर्थव्यवस्थेला चेतना देता येत नाही आणि महागाई तर आटोक्यात ठेवायची आहे. हे कसे साधावे? याला जुनी युक्ति नेहरूव्यवस्थेचीच आहे. जीभेवर खुल्या बाजारपेठेच्या घोषणा बाळगणारे सरकार प्रत्यक्षांत नेहरू सुल्तानीच्या ऐन अंमलाप्रमाणेच धोरण आखत आहे.

देशात गव्हाची आधारभूत किंमत क्किंटलला २८० रूपये असतांना, खुल्या बाजारात त्याच गव्हाची किंमत ३५० रुपये असतांना सरकारने ५६० ते ६०० रू. क्किंटल भावाने दहा लाख टन गहू कॅनडातून खरेदी करून आणला. या गव्हाची पहिली बोट जवाहरलाल नेहरू बंदरात येऊन लागलीसुद्धा. आणि आणखी ५ ते १० लाख टन गहू आयात करण्याची भाषा सुरू झाली आहे.

५० हजार टन खाद्य तेलाची आयात मंजूर करण्यात आली आहे.

दूध महापूर योजनेच्या नावाखाली युरोपातून फुकट दूधभूकटी आणि चरबीची मदत घेऊन देशातील दूध उत्पादन बुडवण्याचे काम नेहरू सुल्तानीत सुरू झाले. मधला कांही काळ ते बंद झाले होते. दूध महापूर योजना टप्पा-३ प्रमाणे अशी भुकटी आणि चरबी यांची फुकट मदत यायला पुन्हा एकदा सुरवात होणार आहे.

दुधावरील प्रक्रिया करण्यासाठी परवान्यांची गरज नाही असे नव्या औद्योगिक धोरणात स्पष्ट झाले होते. पण हे धोरण फिरवून अप्रत्यक्षपणे दूध प्रक्रियेवर परवाना पद्धत

लादण्यात आली आहे.

या व अशा अनेक मार्गांनी शेती मालाला भाव मिळू न देण्याची व्यवस्था झाली म्हणजे त्याबरोबर शेतकऱ्यांना चुचकारण्यासाठी काही उद्योग करावे लागतात. तसे कार्यक्रम सरकारने चालू केले आहेत.

सबसिडीला विरोध करणाऱ्या सरकारने युरियाचा भाव १० टक्क्यांने कमी करून पुन्हा एकदा कोलांटी उडी मारली आहे आणि सबसिडीची रक्कम वाढवली आहे.

शेतीवर जगणाऱ्या शेतकऱ्यांवर प्राप्तीकर लादण्याचा विचार सध्या तरी बाजूला ठेवलेला दिसतो.

निर्यात आणि प्रक्रिया या कामांसाठी सत्ताधारी पक्षाच्या लोकांच्या उदरनिर्वाहाची सोय लावून देणाऱ्या संस्था काढून देण्याची घोषणा बलराम जाखर यांनी केलीच आहे.

या सगळ्या गोंधळात खरीप पिकाच्या आधारभूत किंमतीची घोषणा लांबली. पण, १९९०-९१ या काळात जनता दलाच्या शासनाने आधारभूत किंमती ठरवल्याबद्दल जो एक नवा कालखंड चालू केला तो थांबवणे किंवा उलटवणे या शासनाला शक्य झालेले नाही. त्यामुळें भाताला रूपये ४० प्रति क्विंटल आणि बाकी सर्व भरड धान्यांना ३५ रूपये प्रति क्विंटल जादा भाव देण्याचे जाहिर करण्यात आले आहे. तसेच, तेलबियांच्या भावातही लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. पण, या सर्वच आधारभूत किंमती चालू बाजारभावांपेक्षा काय, पण अगदी हंगामातील अपेक्षित भावांपेक्षांही ही खूपच कमी आहेत.

नरसिंहराव शासन वर्षभरापूर्वी थोड्याशा तरारीने कामाला लागले होते, पण तो उत्साह आतां संपत आला आहे. मरगळ वाढत चालली आहे. शेतकऱ्यांवरचा वरवंटा पुन्हा फिरू लागला आहे. शेतकरी अन्नधान्य, तेलबिया, डाळी किती रोकून ठेवू शकतो आणि बाकीची नगदी पिके किती प्रमाणात निर्यात करू शकतो यावरच शेतकऱ्यांचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

❖ ❖ ❖

# दूध महापूर योजना
# परदेशी दुधाने स्वदेशी दूध नासविण्याचे कारस्थान

देशातील दूध महापूर योजनेचा तिसरा टप्पा येत्या ऑक्टोबरमध्ये यूरोपीय आर्थिक समूहाकडून आयात केल्या जाणाऱ्या शंभर कोटी रुपये किंमतीच्या दूध पावडर व लोणी यांच्या सहाय्याने मार्गस्थ होणार आहे. भारताने दोन वर्षांपूर्वी मध्यपूर्वेतील देशांना व बांगला देशाला आपत्कालीन पुरवठा म्हणून दूध पावडर व लोणी निर्यात केल्यामुळे आर्थिक समूहाने इंडियाला होणारा या वस्तूंचा पुरवठा थांबवला होता. आता या समूहाने दूध महापूर योजनेचा तिसरा टप्पा मार्गी लावण्यासाठी १५००० टन दूध पावडर आणि ५००० टन लोणी पुरवविण्याने मान्य केले आहेः हा प्रकल्प जागतिक बँकेने दिलेले ३६ कोटी डॉलरचे कर्ज, युरोपीय आर्थिक समूहाकडून देणगी म्हणून मिळालेल्या दुग्धजन्य वस्तू व राष्ट्रीय दुग्धव्यवसाय विकास महामंडळाच्या खजिन्यातील ३०० कोटी रुपये अशा तऱ्हने जमा केलेल्या भांडवलावर चालणार आहे. ही माहिती आणंद येथील राष्ट्रीय दुग्धव्यवसाय विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालक डॉ. अमृता पटेल यांनी दिली आहे. (इकॉनॉमिक टाईम्स् ३.८.१९९२)

त्यांनी दिलेल्या माहितीवरून इंडियाची दूध महापूर योजना ही सुरूवातीपासूनच परदेशी मदतीवर चालू आहे. या योजनेचा पहिला टप्पा जागतिक अन्न कार्यक्रमांतर्गत देणगीदाखल मिळालेल्या पदार्थांच्या वापर करून जमा झालेल्या ११० कोटी रुपयांच्या भांडवलावर गाठला गेला. दुसऱ्या टप्प्याच्या २७३ कोटी रूपयांच्या खर्चासाठी जागतिक बँकेकडून १५० कोटी डॉलरचे कर्ज मिळाले. आणि आता तिसऱ्या टप्प्याचा, दोन वर्षे खोळंबून पडलेला १२०० कोटी रुपयांचा गाडा, युरोपीय आर्थिक समूहाची मर्जी झाल्यामुळे पुन्हा सुरू होणार आहे. याचा अर्थ असाही निघू शकतो की उद्या जर का या समूहाची किंवा जागतिक बँकेची मर्जी खप्पा झाली तर हा गाडा मध्येच कुठे तरी अडकून पडेल.

देशातील शेतकऱ्याला डावलूनच देशातील नागरिकां(?) च्या पोटापाण्याची सोय करण्याचे इंडिया सरकारने आणि इंडियन प्रशासनाने ठरविलेले असावे हे याच डॉ. अमृता पटेल यांनी केंद्रशासनाच्या 'दुग्ध व दुग्धजन्यपदार्थांच्या नियंत्रण आदेशा' चे जे समर्थन केले आहे त्यावरून स्पष्ट होते. वर्षभरापूर्वी दूधउत्पादन व दुधावरील प्रक्रिया उद्योगांना लायसन्स-परमिटच्या चक्रातून वगळले होते. मुक्त अर्थव्यवस्थेच्या तत्त्वात हे बसणारेच आहे. त्यामुळे, खाजगी क्षेत्रात दूध व दुग्धजन्य पदार्थांचे व्यवसाय सुरू होऊन दूधउत्पादक शेतकऱ्यांना रास्त भाव मिळणे शक्य होईल. पण गेल्या जूनमध्ये केंद्र शासनाने 'दूध व दुग्धजन्य पदार्थ आदेश' जारी करून पुन्हा एकदा या व्यवसायाला लायसन्स- परमिटच्या चक्रात गुंतविले व मुक्त अर्थव्यवस्थेपासून शेतीक्षेत्राला वंचित करून आपला शेतकरी विरोध स्पष्ट केला.

या आदेशाचे समर्थन करतांना डॉ. अमृता पटेल यांनी म्हटले आहे 'हा आदेश शासनाने काढला नसता तर बहुराष्ट्रीय कंपन्या आणि खाजगी क्षेत्र या दोघांनीही देशात, दुधाचा दुष्काळ पाडला असता. कारण, यांना जनतेला दूध पाजण्यात स्वारस्य नसून त्यापासून इतर पदार्थ बनवून पैसा कमवायचा आहे. दूधव्यवसायातील सहकारी चळवळ या आदेशाचे संरक्षण मिळाले नसते तर पांगळी झाली असती.' (इकॉनॉमिक टाईम्स्, ४/८/९२)

या सहकारी चळवळीचे गुणवर्णन करतांना डॉ. अमृता पटेल म्हणतात, ''खाजगी दूधव्यवसायिकांनी जेथे दुधाची सहज उपलब्धता आहे आणि व्यवसाय करणे किफायतशीर आहे अशाच भागांकडे लक्ष दिले. सहकारी चळवळीने मात्र देशभरात एक प्रचंड घट्ट विणीचे जाळे पसरून दुधाचा तुटवडा असणाऱ्या भागांना

दुधाची मुबलकता असलेल्या भागांशी जोडले.''

या 'अव्यापारेषु व्यापारा' त शेतकऱ्यांना नेमके काय मिळाले हे मात्र हे डॉ. अमृता पटेल यांनी सांगितले नाही. त्यांनी शेतकऱ्याच्या व्यवसाय स्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या या आदेशाबाबत एक गोष्ट मात्र स्पष्ट केली -

नवीन आर्थिक धोरणाला या 'दूध व दुग्धजन्य पदार्थ आदेशा' शी काही देणे घेणे नाही.

का? नवीन आर्थिक धोरण फक्त बिगरशेती उद्योगासाठी आहे, शेतीसाठी नाही?

## व्यापार शेती — एक निवेदन

ता. २४/२५ ऑगस्ट रोजी नांदेड येथे झालेल्या कृतिसमितीच्या बैठकीत व्यापारशेती संबंधाने एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.

शेतकरी संघटनेचे जे कार्यकर्ते किंवा हितचिंतक कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या व्यापारात आहे आणि शेतीमालाच्या व्यापाराच्या कोणत्या ना कोणत्या अंगाचा ज्यांना काही अनुभव आहे अशांची एक विशेष बैठक लवकरच बोलावली जाणार आहे. अशा कार्यकर्त्यांनी आणि हितचिंतकांनी आपले नाव, गाव, पत्ता आणि व्यापारातील अनुभवाचा थोडक्यात तपशील देऊन नावनोंदणी तातडीने करावी. बैठकीची तारीख, वेळ व इतर तपशील नोंदणी करणाऱ्या कार्यकर्त्यांना टपालाने कळवला जाईल.

नावनोंदणी करण्याचा पत्ता :
'व्यापार शेती'
द्वारा, शेतकरी संघटना कार्यालय,
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण,
ता. खेड, जि. पुणे.

# आयातीमागे कोणते अर्थशास्त्र आहे?

**मा. श्री. शरद जोशी यांस**
**स. न. वि. वि.**

पुणे येथील वसंत व्याख्यानमालेत काही वर्षापूर्वी आपले आर्थिक प्रश्नासंबंधी व्याख्यान झाले. ते ऐकण्याकरिता पुण्यातील सुशिक्षित, बुद्धिवादी, विद्यार्थी यांची चांगली उपस्थिती होती. त्या व्याख्यानातील एक मुद्दा मला आजही आठवतो, तो असा-

*सामान्य शेतकरी आज अंगभर वस्त्र सुद्धा घालू शकत नाही. जर शेतमालाला चांगला योग्य भाव मिळाला तर तो धोतरजोडी वापरू शकेल. असे हजारो लाखोंच्या संख्येने धोतरजोडी नेसू लागले तर भारतातील सर्व गिरण्यांना त्यांचे उत्पादन करावे (वाढवावे) लागेल व त्यामुळे गिरणी कामगारांना देखील त्याचा फायदा होईल. व वस्त्रोद्योग धंद्यालाही चांगले दिवस येतील.*

शेतकरी संघटक पाक्षिकात शेतीमालाच्या भावाबाबत सातत्याने लिहिले जात आहे. भारतीय शेतकऱ्यांना जो भाव दिला जातो त्यापेक्षा अधिक किंमत मोजून केंद्रसरकार परदेशातून गहू आयात करत आहे. ही खरोखर चिंतेची बाब आहे. दूरदर्शनवर भारत कशाकशात स्वयंपूर्ण आहे याची यादी वाचली जाते, त्यामध्ये अन्नधान्य याचा आवर्जून उल्लेख असतो. मग, आयात कशासाठी आणि तीही जादा भावाने का केली जाते? हे समजू शकत नाही. यामागे कोणते अर्थ आणि नीतिशास्त्र दडलेले आहे हे एकदा केंद्रसरकारने लोकांना सांगावे.

सत्ताधारी पुढारी जनतेला वेळोवेळी आवाहन करत असतात. सरकारी माध्यमातून होणाऱ्या योजनांना यशस्वी करण्यासाठी व सरकारचे हात बळकट करण्यासाठी याचना करत असतात. शेतकऱ्याचे सहकार्य अपेक्षिता तर मग त्याच्या गाऱ्हाण्याकडे का दुर्लक्ष केले जाते? त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य भाव का दिला जात नाही? महागाई निर्देशांक वाढल्यावर जर सरकारी, निमसरकारी नोकरवर्गास दर सहा महिन्यांनी भत्ता वाढवला जातो; त्याच धोरणाचा अवलंब शेतकऱ्याच्या बाबतीत का केला जात नाही? धोरण सर्वत्र सर्वांना सारखेच पाहिजे. त्यात जर भेदभाव केला जातो तर मग शेतकऱ्यांनी न्याय कोणाकडे मागायचा व त्यासाठी किती वर्षे वाट पाहावी?

**गो. ह. आगाशे**
३५, ब हनुमाननगर,
पुणे - १६

# ९२-९३ खरीप हंगामासाठी शेतीमालाच्या आधारभूत किंमती

केंद्रशासनाने १९९२-९३ च्या खरीपाच्या पिकासाठी कृषिउत्पादन खर्च व मूल्य आयोगाच्या शिफारशी लक्षात घेऊन विविध शेतीमालाच्या आधारभूत / वसुली किंमती जाहीर केल्या आहेत.

**प्रतिक्विंटल आधारभूत किंमती (रुपयांत)**

| शेतीमाल | १९९१-९२ | १९९२-९३ | वाढ |
|---|---|---|---|
| भात | २३० | २७० | ४० |
| ज्वारी,बाजरी,रागी | २०५ | २४० | ३५ |
| मका | २१० | २४५ | ३५ |
| तूर, मूग, उडीद | ५४५ | ६४० | ९५ |
| सोयाबीन (पिवळा) | ४४५ | ५२५ | ८० |
| सोयाबीन (काळा) | ३९५ | ४७५ | ८० |
| भुईमूग (शेंग) | ६४५ | ७५० | १०५ |
| सूर्यफूल (बी) | ६७० | ८०० | १३० |
| कापूस F-414 H-777 | ६९६ | ८०० | १०५ |
| कापूस H-4 | ८४० | ९५० | ११० |

आयात शेतीमालाच्या किमतीच्या किमान पातळ्या ठरविण्यासाठी याचा वापर न होवो म्हणजे झाले.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 6th September, 1992

To

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926÷A83
September 6, 1992

**PNCW 281**
Licence
to post
without
prepayment
**No. 87**

## लाल किल्ल्यावरील स्वातंत्र्यदिन

# डंडा ऊँचा, रहे हमारा ।

१९९१ च्या स्वातंत्र्यदिनी दिल्लीच्या लाल किल्ल्यावरून देशाला परकीय चलन तुटवड्याच्या संकटातून वाचविण्यासाठी देशातील शेतकऱ्यांना 'मोकळेपणा'ने आवाहन करणारे पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव बरोबर एक वर्षाने म्हणजे १५ ऑगस्ट १९९२ रोजी भाषण करतांना म्हणाले, "गेल्या वर्षी देशाची आर्थिक स्थिती अतिशय डबघाईची होती. परंतु, सरकारने आर्थिक सुधारणेचे पाऊल उचलून अर्थव्यवस्था सुधारण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. **देशाचा परकीय चलनसाठा १७००० कोटी रुपये झाला आहे. त्यामुळे, जीवनावश्यक वस्तूंची आयात करावयाची झाल्यास काहीच अडचण येणार नाही.**"

पंजाबमध्ये गहू मुबलक पडला आहे पण त्याला भाव न देता कॅनडातून महागाईने गहू आणला जातो. इतरही शेतीमालांची आयात करण्याचे सरकार ठरवीत आहे. मुक्त अर्थव्यवस्थेची भाषा तोंडावर ठेवून नेहरूनीतीचा डंडा आम्ही अधिक उंच उगारून भारताच्या शेतकऱ्यांच्या माथी मारणार आहोत असा इशारा तर इंडियाच्या पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून दिला नाही ना?

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
फोन : द्वारा ५०६८२

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ**
**११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.**